नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

आज संविधान दिवस

हार्दिक शुभेच्छा!




* वर्ष ५१ * अंक १४३ * * अमरावती * बुधवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

# राममंदिरावर फडकला धर्मध्वज


■ वृत्तसंस्था, अयोध्या, दि. २५ :
अयोध्येत रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेनंतर ६७३ दिवसांनी, पंतप्रधान मोदी आणि संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी राम मंदिराच्या शिखरावर ध्वजारोहण केले.

सकाळी ११:५० वाजता, अभिजित मुहूर्ताच्या वेळी, बटण दाबताच १६१ फूट उंच शिखरावर २ किलोचा भगवा ध्वज फडकला. यासोबतच राम मंदिराचे काम पूर्ण झाले. यादरम्यान, पंतप्रधान मोदी भावुक झाले. त्यांनी हात जोडून धर्मध्वजाला नमस्कार केला.

तत्पूर्वी, राम मंदिरात, पंतप्रधान मोदींनी मोहन भागवत यांच्यासमवेत पहिल्या मजल्यावरील राम दरबारात पहिल्यांदाच पूजा आणि आरती केली. त्यांनी रामलल्लाचे दर्शन घेतले. पंतप्रधान रामलल्लासाठी वस्त्र घेऊन आले. त्यांनी सप्त ऋषींचे दर्शन घेतले, भगवान शेषवतार आणि लक्ष्मण यांची पूजा केली.

यापूर्वी पंतप्रधान मोदींनी साकेत कॉलेजपासून रामजन्मभूमीपर्यंत सुमारे दीड किलोमीटर लांबीचा रोड शो केला. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी ताफ्यावर फुले उधळली आणि महिलांनी त्यांचे स्वागत केले.





यापूर्वी सकाळी रामलल्लाची आरती करण्यात आली. रामलल्लानी आज सोने आणि रेशीम धाग्यांनी बनवलेले पीतांबर वस्त्र परिधान केले. धर्मध्वज वर जाताच पंतप्रधान मोदी, मोहन भागवत आणि मुख्यमंत्री योगी हात जोडून नतमस्तक झाले. धर्मध्वज शिखरावर फडकवताच, परिसरात उपस्थित असलेल्या हजारो संतांनी जय श्रीरामच्या घोषणा दिल्या.

प्रत्येक युगात, रामाचे विचार आपली प्रेरणा असतील. विकसित भारताकडे प्रवासाला गती देण्यासाठी, आपल्याला अशा रथाची आवश्यकता आहे ज्याची चाके धैर्य आणि संयमाने भरलेली असतील. असा रथ ज्याचा ध्वज धोरण आणि हेतूंशी तडजोड करत नाही. असा रथ ज्याचे घोडे शक्ती, ज्ञान, संयम आणि परोपकाराने भरलेले असतील, असे सांगत पीएम मोदी म्हणाले, असा रथ ज्याचे लगाम क्षमा, करुणा आणि संयमाने भरलेले असतील, जिथे यशाचा अहंकार नसतो आणि अपयशातही इतरांबद्दल आदर अबाधित राहतो. खांद्याला खांदा लावून उभे राहण्याचा हा क्षण आहे, हा वेग वाढवण्याचा क्षण आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, १९० वर्षांपूर्वी १८३५ मध्ये लॉर्ड मॅकॉले यांनी मानसिक गुलामगिरीचा पाया घातला. दहा वर्षांनंतर २०३५ मध्ये त्या अपवित्र घटनेला दोनशे वर्ष पूर्ण होतील. पुढील दहा वर्षांत आपण भारताला गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त करू. मॅकॉले यांच्या दृष्टिकोनाचा परिणाम व्यापक झाला. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले, पण आपण न्यूनगंडातून मुक्त झालो नाही. आपण असा विचार विकसित केला की परदेशी गोष्टी चांगल्या आहेत, आपल्या गोष्टी वाईट आहेत. ही गुलामगिरीची मानसिकता आहे. आपण परदेशी देशांकडून लोकशाही उधार घेतली आहे आणि आपले संविधान देखील परदेशी देशांपासून प्रेरित आहे. तर वास्तव असे आहे की भारत लोकशाहीची जननी आहे.

आम्ही गुलामगिरीचे प्रतीक काढून टाकले आहे. आम्ही छत्रपती महाराजांचा वारसा उंचावला आहे. ही रचना नव्हती, तर मानसिकतेत बदल घडवण्याचा क्षण होता. भारताची व्याख्या त्याच्या ताकदीने आणि प्रतीकांनी होईल, दुसऱ्याच्या वारशाने नाही. हा बदल आज अयोध्येत स्पष्ट दिसतो, असे ते म्हणाले . आपला राम आपल्याला भावनांनी जोडतो. त्यांच्यासाठी भक्ती महत्त्वाची आहे, तो सहकार्याला महत्त्व देतो, सत्तेला नाही. आपण त्याच भावनेने पुढे जात आहोत, असेही ते म्हणाले.

## अग्राग्रलेख

## खरीखरी..

# पशुतुल्य गर्जे

महाराष्ट्रा मध्ये बीड नावाचा एक जिल्हा आहे. हा जिल्हा अत्यंत प्रगत आहे असे म्हणतात. परंतु त्या जिल्ह्याची प्रगती जशी आहे तशीच अधोगतीही काही बाबतीत आहे की काय अशी शंका आम्हाला येऊ लागलेली आहे. काही महिन्यांपूर्वी संतोष देशमुख नावाच्या सरपंचाला अत्यंत निर्घृणपणे मारण्यात आले होते. हे प्रकरण संपूर्ण महाराष्ट्राला माहित आहे. ही जी काही घटना घडली त्याच्यामध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मुंडे नावाच्या एका व्यक्तीचा हातभार लागला असे दिसून आलेले आहे. विशेष म्हणजे मुंडे या राजकारणी घराण्याजवळचा कराड नावाचा एक व्यक्ती ज्याला जगमित्र म्हणतात तो सध्या पोलीस आणि न्यायालयीन कोठडीच्या वा?या करीत आहे. त्यातच अजून एक नवीन प्रकरण समोर आलेले आहे. सध्याच्या या नव्या प्रकरणात माजी महिला मंत्र्यांच्या स्वीय सहाय्यकाला आपल्या डॉक्टर असलेल्या पत्नीची हत्या करण्यात जराही लाजलज्जा वाटली नाही. कारण या गर्जे नावाच्या एका मंत्र्यांच्या सहाय्यकाला केवळ गरजेपुरतीच बायको हवी होती. त्याचे नशीब चांगले होते म्हणूनच डॉक्टर असलेली बायको मिळाली. परंतु जर का माणसाला शेण खाण्याची चटक लागली तर त्याची बुद्धी आरोग्यदायी पोळी खाण्यासाठी कधीच चालत नाही आणि अशा शेण खाणाऱ्यांना घरच्या पोळीची मजा आणि चवही कळत नाही. या गर्जे नावाच्या इसमाला चांगली बायको मिळूनही त्यातील मतितार्थ कळला नाही. मात्र जेव्हा डॉक्टर असलेल्या बायकोला आपल्या नवऱ्याच्या काही भानगडी समजल्या. त्या भानगडी मधून जन्माला आलेल्या मुलाच्या बापाचे नाव आपल्या नवऱ्याचे आहे असे समजले. तेव्हा कोणतीही बाई हादरून जाणार नाही काय, हा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्रातील महिलांनी स्वतःला विचारून पहावा. त्यासोबतच राजकारणातील महिलांना हे चालेल काय हे त्यांनी स्वतःच्या अंतर्मनाला विचारावे. कारण हा गर्जे नावाचा नवरा एक हैवान होता. विशेष म्हणजे तो कुठल्यातरी माजी मंत्र्यांचा मदतनीस सुद्धा होता. या भावनाशून्य हैवानाने त्या सुशिक्षित डॉक्टरीणीला मारहाण केली. असा हा नालायक माणूस आपल्या डॉक्टर पत्नीला मारहाण करतो काय, शिव्या काय देतो, तिचा अपमान काय करतो आणि तिची हत्या काय करतो. हे सर्व या बीड जिल्ह्याच्या कुपुत्राने केले आहे. याची लाज शरम त्याला असेल किंवा नसेल परंतु बीडच्या सगळ्या जनतेला हा असभ्यपणा अजिबात सहन होणार नाही. हे आम्हाला माहित आहे. राजू करण्याच्या वाड्यावरून पापावर पांघरूण घालता येत नाही, हे आता त्या पांढरपेशा गुंडाला समजले पाहिजे. आपल्या सहचारिणी सोबत एखादा माणूस किती क्रूर होऊ शकतो याचा हा नमुना आहे. विशेषता जनतेतून निवडून आलेल्या महिलांनी याची दखल घेतली पाहिजे, हे या ठिकाणी आम्हाला नमूद करावेसे वाटते. बीड जिल्हा अनेक प्रकरणांमध्ये बदनाम झालेला आहे. बऱ्याच ठिकाणी बीड म्हणजे चीड अशी संपूर्ण महाराष्ट्रात लोकभावना असताना त्या आगीमध्ये तेल ओतण्याचे काम या गर्जेने केलेले आहे. त्याबद्दल खरे तर त्याला उलटे टांगून मिरच्यांची धुरी दिली पाहिजे. हे लिहिताना आम्हालाही क्रोध येतो आणि लाजही वाटते. 'अरे नीच माणसा तुला नरकातीलही महानरक यातना मिळो', ही आमची मनीषा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# 'बोगस' मतदारांचा सुळसुळाट!

## महापालिकेच्या मतदार यादीत तब्बल ११ लाख दुबार नावे




■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :
मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या तोंडावर एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुंबई महापालिकेने जारी केलेल्या वॉर्डनिहाय आकडेवारीनुसार, मुंबईत तब्बल ११ लाख १५०५ दुबार मतदार असल्याचे समोर आले आहे. यावरून निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मुंबई महापालिकेच्या याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दुबार नावे असून बोगस मतदारांचा भरणा असल्याचा दावा विरोधकांनी केला होता. विरोधकांच्या तक्रारींनंतर आता खुद्द मुंबई महानगरपालिकेनेच संशयित दुबार मतदारांची वॉर्डनिहाय आकडेवारी जाहीर केली आहे. त्यानुसार तब्बल ११ लाखांहून अधिक नावे दुबार असल्याचे स्पष्ट झाले आहे. एवढ्या मोठ्या संख्येने दुबार मतदार असल्याने निवडणुकीच्या निकालावर याचा मोठा परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# मंत्री मेघना बोर्डीकर अजित पवारांना भिडल्या



■ वृत्तसंस्था, परभणी, दि. २५ :
अजित पवारांच्या वक्तव्यानंतर काही तासांतच पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी जोरदार पलटवार केला.

बारामतीच्या विकासासाठी मिळालेला निधी आणि इतर शहरांमध्ये असणारी स्थिती यांची तुलना करत त्यांनी अजित पवारांना थेट प्रश्न केला. बारामतीला दहा रुपये लागत असतील तर तुम्ही शंभर रुपये निधी देता, इतर शहरांचा विकास तसाच का राहिला? असा प्रश्न त्यांनी विचारला.

# निवडणूक आयोग आता भाजप आयोग

■ वृत्तसंस्था, बोनगाव, दि. २५ :
पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी सांगितले की, निवडणूक आयोग आता निष्पक्ष राहिलेला नाही. तो 'भाजप आयोग' बनला आहे. त्या म्हणाल्या की, जर त्यांना बंगालमध्ये आव्हान दिले, तर त्या संपूर्ण देशात भाजपचा पाया हादरवून टाकतील.
ममता बोनगावमध्ये अँटी-एसआयआर रॅलीला संबोधित करत होत्या. ममता यांनी दावा केला की, जर राज्यातील मतुआ-बहुल भागांमध्ये राहणाऱ्या लोकांनी नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा अंतर्गत स्वतःला परदेशी घोषित केले, तर त्यांना तात्काळ मतदार यादीतून वगळले जाईल.

जर एसआयआरचा उद्देश अवैध बांगलादेशींना हटवणे असेल, तर भाजपशासित राज्यांमध्ये रक्क का केले जात आहे? भाजप हे मान्य करत आहे का की त्यांच्या डबल इंजिन असलेल्या राज्यांमध्येही घुसखोर उपस्थित आहेत? जर बांगलादेशी समस्या आहे, तर तुम्ही मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशमध्ये एसआयआरका चालवत आहात? एकदा एसआयआरनंतर आलेली मसुदा मतदार यादी समोर आल्यावर, लोकांना समजेल की निवडणूक आयोग आणि भाजपने किती मोठा विनाश केला आहे, अशा शब्दात त्यांनी भाजपावर ताशेरे ओढले.

## २७ टक्के ओबीसी आरक्षणासह
# निवडणुका होणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :
तत्कालिन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत ओबीसींचे आरक्षण गेले होते. ते आम्ही न्यायालयातून परत मिळवले. परंतु त्याला अवमान याचिका दाखल करून आव्हान देण्यात आले. के.कृष्णमूर्ती यांच्या पीठाच्या निकालाचा त्यासाठी हवाला देण्यात आला आहे. त्यामुळे हे प्रकरण न्यायालयात आता सुरू आहे.



न्यायालयाच्या निकालाची प्रतीक्षा आहे. परंतु राज्य सरकार ओबीसींना २७ टक्के आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यावर ठाम आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

# ७ नेत्यांची पक्षातून हकालपट्टी

## बिहारमध्ये काँग्रेसची मोठी कारवाई

■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. २५ :
बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएने शानदार विजय मिळवला आहे. काँग्रेस आणि आरजेडीचा दारूण पराभव झाला आहे. या पराभवामुळे दोन्ही पक्षांतील अंतर्गत वाद आता समोर आला आहे.

अशातच आता काँग्रेस पक्षाने मोठी कारवाई करत सात नेत्यांची ६ वर्षांसाठी हकालपट्टी केली आहे. पक्षाचे मुख्य प्रवक्ते राजेश राठोड यांनी एक निवेदन जारी करत ही माहिती दिली आहे. कोणत्या नेत्यांना निलंबित करण्यात आले आहे.

कांग्रेसचे बिहारमधील मुख्य प्रवक्ते राजेश राठोड यांनी एक निवेदन जारी करत म्हटले की, बिहार प्रदेश काँग्रेस शिस्तपालन समितीने सात नेत्यांवर कठोर कारवाई केली आहे. पक्षाच्या मुख्य तत्त्वांबद्दल, शिस्त आणि संघटनात्मक शिष्टाचाराबद्दलच्या हलगर्जीपणाबद्दल आणि पक्षाच्या व्यासपीठाबाहेर वारंवार दिशाभूल करणारी विधाने केल्याबद्दल त्यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्यात आले आहे.

काँग्रेसच्या शिस्तपालन समितीचे अध्यक्ष कपिल देव प्रसाद यादव यांनी सांगितले की, निलंबित करण्यात आलेल्या काँग्रेस सेवा दलाचे माजी उपाध्यक्ष आदित्य पासवान, काँग्रेसचे माजी प्रदेश उपाध्यक्ष शकीलुर रहमान, किसान काँग्रेसचे माजी अध्यक्ष राजकुमार शर्मा, युवा काँग्रेसचे माजी प्रदेश अध्यक्ष राजकुमार राजन, मागासवर्गीय विभागाचे माजी अध्यक्ष कुंदन गुप्ता, बांका जिल्हा काँग्रेस समितीच्या अध्यक्षा कांचना कुमारी आणि नालंदा जिल्हा नेते रवी गोल्डन यांच्याकडे स्पष्टीकरण मागितले होते.

# मुंबईत महायुतीचाच महापौर

## शिंदेंचा विश्वास

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :
राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. महायुतीसह महाविकास आघाडीचे नेते प्रचारात व्यस्त आहेत.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्याच्या विविध भागात जाऊन प्रचारसभा घेत आहेत. शिंदेंनी विविध मुद्यांवर भाष्य केले आहे. आगामी मुंबई महापालिकेतील युतीबाबतही एकनाथ शिंदे यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीबाबत विचारलेल्या प्रश्नावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, मुंबई महापालिकेत आम्ही महायुती म्हणून एकत्र लढणार आहोत. मुंबईत महायुतीची सत्ता येईल आणि महायुतीचाच महापौर होईल. कारण गेल्या निवडणुकीत निवडून आलेले जवळपास ७० नगरसेवक शिवसेनेकडे आहेत. २०१२ पासूनचे काही लोक आमच्यासोबत आहेत, जवळपास १२५लोक आणच्याकडे आहेत. त्यामुळे भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीचा आगामी निवडणुकीत विजय होईल आणि महायुतीचा महापौर होईल.

दुसरीकडे, मित्रपक्षातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांना एकमेकांच्या पक्षात प्रवेश द्यायचा नाही, असे महायुतीत ठरवण्यात आले आहे. शिंदे यांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. मी प्रचार करतोय. देवेंद्र फडणवीस, अजित पवार प्रचार करत आहेत. आम्ही प्रचारात आघाडीवर आहोत. लोकांना स्थानिक पातळीवरील विकास पाहिजे. मैत्रीपूर्ण लढतीत एकमेकांवर टीका न करता सकारात्मक पद्धतीने, विकासात्मक प्रचार करायचा, असं आम्ही ठरवलेलं आहे, असे शिंदे यांनी सांगितले.

# डॉ. थोरातांना महात्मा फुले समता पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :
ज्येष्ठ विचारवंत आणि अर्थतज्ज्ञ डॉ. सुखदेव थोरात यांना यंदाचा 'महात्मा फुले समता' पुरस्कार जाहीर झाला आहे.



अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने महात्मा फुले यांच्या १३५ व्या पुण्यतिथी आणि समता दिनानिमित्त हा पुरस्कार दिला जातो. पुरस्कार प्रदान सोहळा शुक्रवार, २८ नोव्हेंबर २०२५ रोजी पुण्यात होणार आहे. महात्मा फुले समता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी ही माहिती दिली.
या पुरस्काराचे स्वरूप रुपये एक लाख, फुले पगडी, मानपत्र, शाल आणि स्मृतीचिन्ह असे आहे. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता, समता भूमी, फुले वाडा, पुणे येथे हा सोहळा पार पडेल.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमात खासदार उपेंद्र कुशवाहा आणि समता परिषदेचे संस्थापक-अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या हस्ते डॉ. थोरात यांना पुरस्कार प्रदान केला जाईल. यावेळी हेमंत रासने, रूपाली चाकणकर, बाळासाहेब शिवरकर, कमल ढोले-पाटील, दिप्ती चवधरी यांची प्रमुख उपस्थिती असेल.

# निर्मला गावितांचा भीषण अपघात

■ वृत्तसंस्था, नाशिक, दि. २५ :
इगतपुरीच्या माजी आमदार आणि शिंदे गटाच्या नेत्या निर्मला गावित यांचा नाशिकमध्ये अत्यंत भीषण अपघात झाला आहे. घराबाहेर नातवाला घेऊन फेरफटका मारत असतानाच पाठीमागून आलेल्या एका भरधाव कारने त्यांना जोराची धडक दिली.

हा अपघात इतका भयानक होता की, कारने त्यांना काही फुटांपर्यंत फरफटत नेले. या घटनेत त्या गंभीर जखमी झाल्या असून, सध्या नाशिकमधील एका खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात (क्ळव) त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. निर्मला गावित यांचा हा अपघात काल सोमवारी घडला. निर्मला गावित आपल्या नातवासोबत घराबाहेर चालत होत्या. त्यावेळी अचानक मागून आलेल्या एका कारने त्यांना धडक दिली. धडक बसताच गावित कारच्या बोनेटवर आदळल्या.

# भारताला क्लीन स्वीपचा धोका

## बुधवारचा पूर्ण दिवस काढावा लागणार आफ्रिकेला ८ विकेट्सची गरज

■ वृत्तसंस्था, गुवाहाटी, दि. २५ :
दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या गुवाहाटी कसोटीत भारतीय संघाला पराभव आणि क्लीन स्वीपचा धोका आहे. विजयासाठी ५४९ धावांचे अशक्य वाटणारे लक्ष्य गाठताना, चौथ्या दिवशी खेळ थांबला तेव्हा भारताने दोन विकेट गमावून फक्त २७ धावा केल्या. साई सुदर्शन आणि कुलदीप यादव नाबाद राहिले. सलामीवीर यशस्वी जयस्वाल १३ आणि केएल राहुल ६ धावांवर बाद झाले.

तत्पूर्वी, दक्षिण आफ्रिकेने आपला दुसरा डाव २६०/५ धावांवर घोषित केला. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ४८९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात, भारताचा पहिला डाव २०१ धावांवर संपला, ज्यामुळे भारतासमोर कसोटी जिंकण्यासाठी ५४९ धावांचे लक्ष्य होते. दक्षिण आफ्रिकेने पहिली कसोटी ३० धावांनी जिंकली. जर संघाने गुवाहाटी कसोटी जिंकली तर २५ वर्षांनंतर भारतात मालिका विजय आणि भारताविरुद्ध क्लीन स्वीप साध्य होईल. दक्षिण आफ्रिकेने २००० मध्ये दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारताला २-० असे पराभूत केले होते. आता सामन्याचा पाचवा आणि शेवटचा दिवस बुधवारी सकाळी ९ वाजता सुरू होईल.

# भारत-पाक सामना १५ फेब्रुवारीला

## टी-२० विश्वचषक : भारत-श्रीलंकेच्या मैदानांवर ५५ सामने

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :
आयसीसीने टी-20 विश्वचषक 2026 चे वेळापत्रक (शेड्यूल) जाहीर केले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील गट फेरीचा (ग्रुप स्टेज) सामना 15 फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये होईल. ही स्पर्धा भारत आणि श्रीलंकेतील 7 शहरांमधील 8 ठिकाणी (वेन्यू) खेळवली जाईल. 29 दिवसांत 55 सामने होतील.




भारताचे विश्वचषक विजेते कर्णधार रोहित शर्मा यांना स्पर्धेचे ब्रँड ?म्बेसेडर बनवण्यात आले आहे.

मुंबईत आयसीसीचा समारंभ झाला, जिथे समितीने सांगितले की, उद्घाटनाचा सामना 7 फेब्रुवारी रोजी पाकिस्तान आणि नेदरलँड्स यांच्यात होईल. गट फेरीत (ग्रुप स्टेज) दररोज 3 सामने खेळले जातील. अंतिम सामना अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर होईल. जर पाकिस्तानने नॉकआउट फेरीत प्रवेश केला, तर सामने श्रीलंकेत होतील. या स्पर्धेत 20 संघ आहेत, ज्यांना 4 वेगवेगळ्या गटांमध्ये विभागले आहे.

भारतात अहमदाबादमधील मोदी स्टेडियम, नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियम, कोलकातामधील ईडन गार्डन्स स्टेडियम, चेन्नईतील चेपॉक स्टेडियम आणि मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये सामने खेळले जातील. तर श्रीलंकेत कोलंबो आणि कँडीमध्ये सामने होतील. कोलंबोमध्ये आर प्रेमदासा आणि सिंहलीज स्पोर्ट्स क्लब स्टेडियमवर सामने खेळले जातील. टीम इंडिया मुंबई, दिल्ली, कोलंबो आणि अहमदाबादमध्ये गट फेरीचे सामने खेळेल.

# इथिओपियामध्ये १२ हजार वर्षांनंतर ज्वालामुखीचा उद्रेक

## १५ किलोमीटर उंच धुराचे लोट सर्वत्र भीती : २ उड्डाणे रद्द

■ वृत्तसंस्था, अदीस अबाबा, दि. २५ :
इथियोपियामध्ये एक ज्वालामुखी १२ हजार वर्षांनंतर अचानक रविवारी फुटला. या स्फोटातून निघणारा धूर सुमारे १५ किमी उंचीपर्यंत पोहोचला आणि लाल समुद्र पार करत येमेन आणि ओमानपर्यंत पसरला.

हा स्फोट अफार प्रदेशातील हेली गुब्बी ज्वालामुखीमध्ये झाला. हा इतका जुना आणि शांत ज्वालामुखी होता की आजपर्यंत त्याची कोणतीही नोंद नव्हती. या घटनेत कोणाचाही मृत्यू झाला नाही, परंतु येमेन आणि ओमानच्या सरकारने लोकांना, विशेषतः ज्यांना श्वास घेण्यास त्रास होतो, त्यांना सावधगिरी बाळगण्यास सांगितले आहे.
आकाशात पसरलेल्या राखेमुळे विमानांनाही अडचणी येत आहेत. भारतापर्यंतही राख



येण्याची शक्यता आहे, त्यामुळे दिल्ली-जयपूरसारख्या भागांतील विमानांवर लक्ष ठेवले जात आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, ज्वालामुखीच्या स्फोटामुळे सोमवारी कोची विमानतळावरून निघणाऱ्या दोन आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली.

राखेचे कण इंजिनला नुकसान पोहोचवू शकतात, त्यामुळे आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक प्रोटोकॉलनुसार खबरदारी घेतली जात आहे. धोकादायक लाल आणि नारंगी क्षेत्रांपासून वाचण्यासाठी अनेक विमानांनी आपला मार्ग बदलला किंवा उड्डाणे रद्द करण्यात आली.

राखेचे हे ढग दोन दिवसांत दिल्ली, पंजाब आणि हरियाणाच्या भागांतही पोहोचू शकतात अशी शक्यता आहे. यादरम्यान, भारताच्या डायरेक्टरेट जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशनने विमान कंपन्यांसाठी सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. विमान कंपन्यांनी उड्डाणे टाळावीत, असे निर्देश जारी झाले आहेत.

## ठाकरेंना नाशिकमध्ये मोठा धक्का



■ **नाशिक :** मनमाड शहरात नगरपरिषद निवडणुकीची धुगधुगी वाढत असतानाच एक मोठा धक्का बसला आहे. प्रभाग क्रमांक १०-अ मधून शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार असलेले नितीन वाघमारे यांचे काल रात्री अचानक हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

नितीन वाघमारे हे गेल्या अनेक वर्षांपासून प्रभाग १०-अ मध्ये लोकसंपर्क, सार्वजनिक प्रश्नांवर आवाज उठविणे आणि स्थानिक पातळीवरील कामांमध्ये अग्रेसर होते. त्यामुळे या प्रभागाची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर अनेकांनी त्यांचे स्वागत केले होते. मात्र अचानक त्यांचा मृत्यू झाला. या घटनेचा निवडणूक व्यवस्थापनावर परिणाम होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रभागातील प्रचार मोहीम तात्पुरती स्थगित करण्यात आली असून भावनिक वातावरणात पुढील रणनीतीबाबत चर्चा सुरू आहे.

## मुंडेंची राष्ट्रवादीतून हकालपट्टी करा

### सुप्रिया सुळे यांची अजित पवारांकडे मागणी





**सातारा :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी परळीच्या जाहीर सभेत संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील प्रमुख आरोपी वाल्मीक कराडची आठवण काढली होती. त्यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी त्यांच्या पक्षातून हकालपट्टीची मागणी केली आहे. कुणाच्या तरी वडिलांची, महाराष्ट्राच्या लेकाची क्रूर हत्या करणाऱ्यांना फाशी दिली पाहिजे. तसेच अशा लोकांची आठवण काढणाऱ्यांचाही जाहीर निषेध केला पाहिजे, असे त्या म्हणाल्यात.

सुळे म्हणाल्या, मी धनंजय मुंडे यांच्या विधानाचा जाहीर निषेध करते. ज्या लोकांनी कुणाच्या तरी वडिलांची, महाराष्ट्राच्या लेकाची क्रूर हत्या केली, त्यांना फाशीची शिक्षा द्यायला पाहिजे. पण अशा लोकांची राज्यातील कोणत्याही नेत्याला आठवण येत असेल तर त्याचा जाहीर निषेधच केला पाहिजे. अशा प्रवृत्तीला एखाद्या पक्षातून मदत करण्याची भूमिका घेतली जात असेल तर संबंधितांना पक्षातून काढून टाकले पाहिजे. माझी त्या पक्षाच्या नेत्यांना तशी विनंती आहे. या लोकांना क्रूर हत्याकांडातील लोकांची आठवण येत असेल तर त्यांची विचारधारा काय आहे? यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित होते. हत्येतील आरोपींना मदत करण्याची भाषा महाराष्ट्राच्या ऐक्यासाठी घातक आहे.

## अजित पवार जबाबदार नेते पण... बोलताना तारतम्य ठेवावे



**मुंबई :** अजित पवार हे जबाबदार नेते आहेत, पण प्रत्येकाने बोलताना तारतम्य बाळगले पाहिजे, माज्या सारखी कार्यकर्ता अजित पवारांना काय सांगणार, असे भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांनी म्हटले आहे. अजित पवार राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत मी त्यांच्यासोबत काम केले आहे, त्यामुळे सर्वच कार्यकर्ते अन् नेत्यांनी तारतम्य ठेवून बोलले तर बरे राहील. आमदार चित्रा वाघ म्हणाल्या की, प्रचारसभांमध्ये कोण काय म्हणतंय हे काही महत्त्वाचे नाही. राज्याचे प्रमुख मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत त्यांच्या नेतृत्वामध्ये महाराष्ट्र प्रगती करतो आहे, त्यामुळे कोण काय बोलतो याला फारसे महत्त्व नाही. निधीच्या चाव्या आमच्या हातात या राष्ट्रवादीच्या प्रचार मुद्द्यावर बोलताना त्यांनी असे म्हटले आहे.

आमदार चित्रा वाघ म्हणाल्या की, निवडणुकीच्या प्रचार सभांमध्ये प्रत्येकाने आपले काम सांगावे आणि यापुढे काय काम करणार आहे हे सांगावे त्यांचा जास्त फायदा होईल. काही ठिकाणी आम्ही युतीमध्ये तर काही ठिकाणी आम्ही स्वतंत्र लढत आहोत. लोकांसाठी आपण काम केले तर लोकं ती कामे विसरत नाहीत. जनता सुज्ञ असल्याने आपण केलेले काम आणि लोकांचा विश्वास यावर या निवडणूका आहेत.

## दीर-नणंदेलाही ताब्यात घ्या

**मुंबई :** मंत्री पंकजा मुंडे यांच्या पीए असलेल्या अनंत गर्जे यांना त्यांच्या पत्नी डॉ. गौरी पालवे-गर्जे यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणात पोलिसांनी अटक केली. या घटनेला गौरीच्या कुटुंबाकडून आत्महत्येऐवजी घातपाताचा आरोप होत आहे.

गौरीच्या मृत्यूनंतर तिचे वडील अशोक पालवे यांनी वरळी पोलिस ठाण्यात अर्ज देत गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या मते, गौरीच्या मृत्यूस जबाबदार फक्त अनंत नव्हे, तर त्याचे भाऊ अजय गर्जे आणि बहिण शितल आंधळे देखील आहेत. त्यांनी आपल्या पत्रात या तिघांची नावे स्पष्टपणे आरोपी म्हणून नमूद केली असून, सध्या फक्त अनंतला अटक होऊन इतर दोघे मोकाट फिरत असल्याचा आरोप पालवे यांनी केला आहे. तसेच घटनेच्या दिवशी बिल्डिंगमधील लिफ्ट, जिना आणि मुख्य प्रवेशद्वाराचे उउळश फुटेज तातडीने जप्त करावे, अशी मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे.

# महाराष्ट्रात घराणेशाहीचा कळस

### शिवसेनेचे एकाच घरातील सहा उमेदवार : सामान्य कार्यकर्त्यांना नो एन्ट्री



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जसजशा जवळ येत आहेत, तसतसे राज्याच्या राजकारणात घराणेशाहीचा मुद्दा पुन्हा एकदा गाजू लागला आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा आता अधिकच खोलवर रुजली असल्याचे या निवडणुकीत स्पष्ट दिसून येत आहे.

कोणताही पक्ष असो, उमेदवारीच्या वाटपात सामान्य कार्यकर्त्यांपेक्षा नेत्यांच्या घरातील सदस्यांना अधिक प्राधान्य दिल्याचे वास्तव लपलेले नाही. यामुळे कोणत्याही पक्षाचे नाव पुढे करीत असले तरी प्रत्यक्षात सत्ता आणि नेतृत्व हे काही विशिष्ट कुटुंबांच्या भोवतीच फिरत असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये वाढू लागली आहे. या पार्श्वभूमीवर काही नगरपरिषदांमधील उमेदवारीने तर घराणेशाहीचा कळस गाठल्याची चर्चा सुरू झाली आहे.

कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेत तर हा प्रकार सर्वाधिक चर्चेत आहे. शिवसेना शिंदे गट या पक्षाने शहराध्यक्ष वामन म्हात्रे यांच्या संपूर्ण कुटुंबालाच तिकीट देऊन सर्वांचेच लक्ष वेधले आहे. वामन म्हात्रे स्वतः, त्यांची पत्नी, भाऊ, भावजई, मुलगा आणि पुतण्या यांना एकाचवेळी उमेदवारी देण्यात आली आहे. एका कुटुंबातील सहा जण थेट मैदानात उतरल्याने बदलापूर शहरात राजकीय वातावरण तापले आहे. कार्यकर्त्यांच्या नाराजीपासून ते जनतेच्या चर्चांपर्यंत या निर्णयाचे पडसाद उमटत आहेत. २०१५ मध्येही म्हात्रे कुटुंबातील चार जणांना तिकीट मिळाले होते, त्यामुळे घराणेशाहीचा हा पॅटर्न पुन्हा उघड झाला आहे. या निर्णयावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे किंवा इतर नेते काय म्हणतात, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

फक्त शिवसेनाच नव्हे, तर भाजपमध्येही यावर्षी हा कल दिसून येत आहे. नांदेड जिल्ह्यातील लोहा नगरपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षानेही एकाच कुटुंबातील सहा जणांना उमेदवारी देत आश्चर्याचा धक्का दिला आहे. नगराध्यक्षपदासाठी गजानन सूर्यवंशी यांच्या नावासोबतच त्यांची पत्नी, भाऊ आणि इतर नातेवाईकांना स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे भाजपने घराणेशाही विरोधातील आपली भूमिका स्वतःच गोंधळात टाकल्याची टीका विरोधकांकडून होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेकदा विरोधकांच्या घराणेशाहीवर टीका केली असतानाच, स्थानिक पातळीवर मात्र अशा प्रकारे तिकीट वाटप होत असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**पक्षांमध्ये असंतोष वाढण्याची शक्यता**

या दोन्ही उदाहरणांमुळे कार्यकर्त्यांच्या मनात एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सामान्य कार्यकर्त्यांचे राजकारणात नेमके स्थान काय? अनेक वर्षांची मेहनत, जनसंपर्क आणि संघटन बांधणी केल्यानंतरही पक्षातील मोठ्या पदांसाठी नेत्यांच्या आपल्या घरातील सदस्यांनाच प्राधान्य देण्यात येत असल्याची भावना आता उघडपणे व्यक्त होऊ लागली आहे.

काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी नाराजीही व्यक्त केल्याचे सांगितले जात आहे. स्थानिक निवडणुकांमध्ये तिकीट वाटप ही कार्यकर्त्यांच्या अंतिम अपेक्षांपैकी एक असते. परंतु ही अपेक्षाच सतत नातेवाईकांनाच दिली जात असल्याने पक्षांमध्ये असंतोष वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

राज्यातील अनेक नगरपंचायती आणि नगरपरिषदांमध्ये अशाच प्रकारचे चित्र दिसत असल्याने घराणेशाहीचा मुद्दा पुन्हा एकदा निवडणुकीचा केंद्रबिंदू बनला आहे. एकीकडे नेते सामान्य कार्यकर्त्यांना संघटना मजबूत करण्याचे आवाहन करतात, तर दुसरीकडे निर्णय मात्र आपल्या परिवारापुरते मर्यादित ठेवतात. यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह कमी होत आहे. उमेदवारी वाटप पक्षांना कितपत फायद्याचे किंवा तोट्याचे ठरणार, हे निकालांनंतर स्पष्ट होणार आहे.

## महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास शासनाचे प्रथम प्राधान्य



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :** राज्यातील ग्रामीण भागातील महिलांना अर्थार्जनासाठी विविध संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ग्रामविकास विभागांतर्गत उमेद अभियानांतर्गत काम सुरू आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील महिलांना आर्थिक सक्षमता व शाश्वत उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उमेदझमहाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका अभियान आणि राह फाउंडेशन यांच्यातील सामंजस्य करार निश्चितच व्यापक प्रमाणावर विस्तार करण्यास सहायक ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

ग्रामीण आणि आदिवासी भागातील महिलांना आर्थिक सक्षमता व शाश्वत उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उमेद आणि राह फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

फडणवीस यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील जनतेला आर्थिक विकासाच्या संधी निर्माण करण्यासाठी वैविध्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. प्रामुख्याने पालघर, नाशिक आणि रायगड या भागातील आदिवासी तसेच ग्रामीण महिलांसाठी त्यांच्या अंगभूत कौशल्याचा आणि स्थानिक संसाधनाचा वापर करून संधीचा विस्तार करण्यात येणार आहे. ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि सक्षम करण्यासाठी उमेदसह विविध योजना, उपक्रम राबविले जात आहेत. राह फाऊंडेशन सोबतच्या सामंजस्य कराराने या तीन जिल्ह्यांतील महिलांना तांत्रिक ज्ञान, अद्ययावत माहिती यांच्या सहाय्याने अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने भरीव प्रयत्न करण्यात येणार आहे.

या कराराचा उद्देश पालघर, नाशिक आणि रायगड जिल्ह्यांतील महिलांना हवामान, स्मार्ट शेती, जलसुरक्षा आणि निसगार्धारित उपजीविका उपक्रमांद्वारे सक्षम करणे आहे. राह फाउंडेशनचे तांत्रिक ज्ञान आणि उमेदच्या स्वयं-सहायता गटांचे विस्तृत जाळे यांचा समन्वय साधून ग्रामीण महिलांना साधन संपत्ती, प्रशिक्षण आणि बाजार पेठेतील संधी मिळतील. या भागीदारीअंतर्गत तीनही जिल्ह्यांमध्ये दोन नर्सरी विकास व जैव-उत्पादन केंद्रे उभारली जाणार असून ५ हजारांहून अधिक महिला आणि शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल. तसेच महिलांच्या सहभागाने फूड फॉरेस्ट प्रकल्प उभारला जाणार आहे, ज्यातून प्रत्येक महिलेला वर्षाला १ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

## ओबीसी आरक्षण : सुनावणी पुन्हा लांबली

### स्थानिकच्या निवडणुकीवरील टांगती तलवार कायम

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २५ :** महाराष्ट्रातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणाऱ्या ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर आज २५ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या पीठासमोर ही सुनावणी झाली. केंद्र सरकारतर्फे हजर असलेल्या सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरकारला अधिक माहिती गोळा करण्यासाठी थोडा अतिरिक्त वेळ देण्याची विनंती केली.

ही मागणी मान्य करत न्यायालयाने पुढील सुनावणी २८ नोव्हेंबर रोजी म्हणजेच शुक्रवारी नियोजित केली. या निर्णयामुळे आधीच लांबलेल्या आरक्षण प्रक्रियेत पुन्हा एकदा विलंब झाला असून, राज्यातील निवडणुकांवर अनिश्चिततेचे वातावरण कायम आहे.

याचिकाकर्त्यांनी सुनावणीदरम्यान ठामपणे सांगितले की, अनेक नगरपरिषदांमध्ये ५० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन होत आहे आणि निवडणूक प्रक्रिया आधीच सुरू असल्याने आणखी वेळ देणे अयोग्य आहे. अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत पार गेल्यामुळे उमेदवार निवडणूक प्रक्रियेत सक्रिय झाले आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बाँठिया आयोगापूर्वीच्या परिस्थितीत ओबीसी आरक्षण अस्तित्वात नव्हते आणि त्या काळातील कायदा सर्वोच्च न्यायालयानेच निश्चित केला होता, अशीही आठवण याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला करून दिली. त्यामुळे या टप्प्यावर बदल करणे योग्य नाही आणि वेळ वाढवून घेण्यामागे हेतुपुरस्सर विलंब दिसत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

दरम्यान, निवडणूक आयोगानेही सुनावणीत बाजू मांडताना सांगितले की, न्यायालयाने जर आज कोणताही निर्णय दिला तर आयोगाला नव्या आरक्षण वर्गवारीनुसार पुढील प्रक्रिया करावी लागेल. त्यामुळे स्पष्ट निर्देश मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की, निवडणुका केवळ न्यायालयाने दिलेल्या अंतिम आदेशानुसारच पार पडतील आणि कोणतीही तातडीची भूमिका आज जाहीर करणे शक्य नाही.

अखेर न्यायालयाने सुनावणी शुक्रवारी दुपारी १२ वाजता ठेवली आणि तोपर्यंत सर्व पक्षकारांनी संबंधित माहिती तसेच आवश्यक कागदपत्रे सादर करावीत, असे निर्देश दिले. आता शुक्रवारी होणा?्या सुनावणीकडे राज्याचे राजकीय वातावरण आणि प्रशासनाचे लक्ष लागले आहे.

## राज्य निवडणूक आयोगाला काँग्रेसचे कमिटीचे पत्र

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :** महाराष्ट्र काँग्रेसने राज्य निवडणूक आयोगाला एक पत्र पाठवून महानगरपालिका प्रारुप मतदार याद्यांच्या हरकतीची मुदत १५ दिवसांनी वाढवण्याची मागणी केली आहे. हरकती नोंदवण्याची मदत अत्यंत क्लिष्ट व वेळकाढू आहे. त्यामुळे मतदार याद्या तपासण्यासाठी वाढीव वेळ लागण्याची शक्यता असल्यामुळे ही मुदत वाढवून द्यावी, असे काँग्रेसने म्हटले आहे.

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांसाठी प्रारुप मतदार याद्यांवर हरकती व सूचना घेण्यासाठी २७ नोव्हेंबर पर्यंतची मुदत आहे. ती वाढविण्याची मागणी काँग्रेसने केली आहे.

# शरद पवार लावणार मनसेसाठी ताकद

### काँग्रेसची काढणार समजूत : मुंबईत भाजपला हरवण्यासाठी खेळी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुंबई महापालिकेपासून भाजपला दूर ठेवण्यासाठी आता दंड थोपटलेत.

मनसेच्या मुद्यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व काँग्रेसमध्ये तणाव वाढल्यानंतर आता त्यांनी महाविकास आघाडीचे सूत्रे आपल्या हाती घेतली आहेत. त्यांनी भाजपला मुंबईपासून दूर ठेवण्याचे एकमेव टार्गेट ठेवले आहे. या प्रकरणी त्यांची काँग्रेस हायकमांडशी चर्चा करून मुंबई काँग्रेसची समजूत काढण्याचा निश्चय केला आहे. मनसे विरोधकांच्या तंबूत आली तर मराठी मतांची फाटाफूट टळून मुंबईत महाविकास आघाडीचा विजय सहजसोपा होईल, असा त्यांचा व्होरा आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, यासाठी त्यांनी मुंबई काँग्रेसची समजूत काढण्याचा व प्रसंगी काँग्रेस हायकमांडशी चर्चा करून मनसेला महाविकास आघाडीत घेण्याचा निश्चय घेतला आहे. मनसे विरोधकांच्या तंबूत आली तर मराठी मतांची फाटाफूट टळून मुंबईत महाविकास आघाडीचा विजय सहजसोपा होईल, असा त्यांचा व्होरा आहे.



मुंबई काँग्रेसने मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढवण्याची घोषणा केली आहे. ठाकरे गटाने मनसेला सोबत घेताना आपल्याला विश्वासात घेतले नाही असा त्यांचा आरोप आहे. गरीबांना मारझोड करणाऱ्या मनसेसोबत आम्ही जाणार नाही. काँग्रेसच्या विचारात असे प्रकार बसत नाहीत, असा त्यांचा आरोप आहे.

या मुद्यावर ठाकरे गट व काँग्रेसमध्ये राजकीय अंतर वाढले आहे. परिणामी, मुंबई महापालिका निवडणुकीच्या ऐन तोंडावर महाविकास आघाडीत फूट पडण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे शरद पवारांनी या वादावर पडदा टाकून विरोधकांची वज्रमुठ बांधण्याचा निर्णय घेतला आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, मुंबईत भाजपच्या नेतृत्वातील महायुतीला पराभवाची धूळ चारण्यासाठी व बीएमसीवरील शिवसेना ठाकरे गटाची सत्ता अबाधित राखण्यासाठी शरद पवार आपली पूर्ण ताकद लावतील.

या प्रकरणी सर्वप्रथम ते महाविकास आघाडीत राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील मनसेला प्रवेश देण्याचा मुद्दा निकाली काढतील. मुंबई महापालिकेत ठाकरे बंधूंना सोबत घेण्याच्या मुद्यावर शरद पवार लवकरच काँग्रेसच्या दिल्ली स्थित हायकमांडशी चर्चा करतील. यासाठी ते लवकरच दिल्लीच्या दौऱ्यावर जातील किंवा फोनवरूनच ते त्यांच्याशी संपर्क साधतील.

शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी नुकतेच तसे संकेत दिलेत. मुंबईत मनसेचा चांगला जनाधार आहे. ते सोबत राहिले तर मराठी मतांची फाटाफूट टळेल असे आव्हाड म्हणाले.

## संजय लवकरच मैदानात दिसतील, तेही हातात तलवार घेऊन..

### राऊतांच्या भेटीनंतर उद्धव ठाकरेंनी व्यक्त केला विश्वास

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :** शिवसेनेचे नेते आणि महाविकास आघाडीचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज संजय राऊत यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी भांडूप येथील त्यांच्या घरी भेट दिल्यानंतर मोठे विधान केले आहे.

राऊत यांची तब्येत मागील काही दिवसांपासून बिघडलेली असल्याने त्यांनी सार्वजनिक कार्यक्रमांपासून अंतर ठेवले आहे. मात्र, आज झालेल्या भेटीत राऊत यांचा उत्साह पाहून उद्धव ठाकरे यांनी समाधान व्यक्त केले.

माध्यमांशी बोलताना त्यांनी विनोदी शैलीत सांगितले की, आता मी राऊतांना रोज फोन न करता त्यांच्या भावालाच त्यांची खबरबात घेण्यासाठी त्रास देतो. त्यांनी पुढे सांगितले की राऊत आता प्रकृतीच्या अडचणीतून सावरत असून त्यांचे पुनरागमन लवकरच होणार आहे. फक्त परत येणार नाहीत, तर पूर्वीपेक्षा अधिक जोमाने राजकीय रणांगणात उतरणार, असा विश्वासही ठाकरे यांनी व्यक्त केला.





संजय लवकरच पुन्हा मैदानात दिसतील आणि या वेळी हातात तलवार घेऊन, अशा शब्दांत त्यांनी राऊतांच्या लढाऊ वृत्तीवर मोहोर मारली. ठाकरे यांच्या या विधानामुळे शिवसेना-ठाकरे गटात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राज्यसभा खासदार संजय राऊत हे गेल्या काही दिवसांपासून प्रकृतीच्या गंभीर समस्यांमुळे घराबाहेर निघू शकले नाहीत. वैद्यकीय तपासणीत त्यांना गंभीर प्रकारचा आजार असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांती घेण्यास सांगितले. याच पार्श्वभूमीवर मंगळवारी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी खास त्यांच्या भांडूप येथील निवासस्थानी जाऊन भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची सविस्तर विचारपूस केली.

# शेवगा झाला चिकनपेक्षा महाग

### ठरलाय 'लक्झरी भाजी' : दर विक्रमी ४०० ते ५०० रुपयांवर पोहोचले



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २५ :** पुणे मार्केट यार्डातील शेवग्याची आवक तब्बल 90 टक्क्यांनी घटली आहे. त्यामुळे शेवग्याने चिकनला मागे टाकत बाजारात अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. सध्या पुण्यात चिकन 220 ते 250 रुपये किलोने मिळते, तर शेवगा 400 ते 500 रुपये किलोने विकला जात आहे.

सोलापूर जिल्ह्यात शेवग्याची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. पण लांबलेला पाऊस व अतिवृष्टीमुळे सोलापूरसह अनेक भागांतील शेवग्यांचे पीक अक्षरशः उद्धवस्त झाले आहे. यामुळे शेवग्याचा यंदाचा हंगाम विलंबाने सुरू होण्याची शक्यता आहे. एरवी घाऊक बाजारात दररोज 4 ते 5 हजार किलो शेवग्याची आवक होत असते. अल्पशी आवक केवळ आंध्र प्रदेशातून आली. यामुळे गत आठवड्यात जो शेवगा 140 ते 150 किलो दराने मिळत होता. तो आता थेट 500 रुपयांवर पोहोचला आहे.

घाऊक बाजारात 10 किलो शेवग्याला 3000 चा भाव मिळत आहे. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड आडत संघटनेचे माजी अध्यक्ष विलास भुजबळ आणि ज्येष्ठ व्यापारी रामदास काटकर यांनी ही माहिती दिली. मागणीच्या तुलनेत आवक अतिशय कमी झाल्यामुळे ही दरवाढ झाली. उल्लेखनीय बाब म्हणजे मुंबईसह राज्यभरातील दाक्षिणात्य उपहारगृह चालकांकडून सांबार, रसमसाठी शेवग्याला वर्षभर मोठी मागणी असते. दररोज मोठी खरेदी करणारे हे व्यावसायिक आता वाढलेल्या दरामुळे चिंतेत सापडले आहेत.

शेवगा उष्ण असल्यामुळे हिवाळ्याच्या दिवसांत गृहिणींकडून शेवग्याला मोठी मागणी असते. मधुमेह व इतर आजारांसाठीही शेवगा गुणकारी असल्याने त्याचा वापर वाढला आहे. त्यातच आता शेवग्याला सोन्याचा भाव आल्यामुळे ही आरोग्यदायी भाजी आता सर्वसामान्यांच्या ताटातून हद्दपार होण्याची भीती वाढली आहे.

**संभाजीनगरमध्येही आवक घटली**

छत्रपती संभाजीनगरच्या जाधववाडीच्या मंडीमध्येही शेवग्याची आवक घटली आहे. जाधववाडीत गत 9 नोव्हेंबर रोजी म्हणजेच दिवाळीपूर्वी 14 क्विंटल शेवग्याची आवक होऊन 3000 ते 6200 रुपये क्विंटलने ठोक विक्री झाली होती, तर गुरुवारी 9 क्विंटल आवक होऊन 7000 ते 11000 रुपये क्विंटलने ठोक विक्री झाली. त्याचाच परिणाम म्हणून शेवग्याची 60 रुपये पाव या दराने किरकोळ विक्री झाल्याचे दिसून आले.

# आता मुंबईत होणार गोदा आरती : देशभरातून प्रस्ताव



■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. २५ :** नाशिकची ओळख बनलेली गोदा आरती आता इतर शहरांतही सुरू होणार आहे. रामतीर्थ गोदा सेवा समितीने तयार केलेल्या आराखड्याच्या आधारे देशभरातील विविध शहरांनी या आरतीसाठी प्रस्ताव पाठविले असून, समितीने यासाठी विशेष प्रशिक्षण मोहीम सुरू केली आहे.

नाशिकच्या गोदा आरतीला काश्मीर, विशाखापट्टणम, हैदराबाद,मुंबई, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, नवी मुंबई, गुजरातमधील व्यारा व सुरत, तसेच मालेगाव-झोडगे येथून आमंत्रणे मिळाली आहेत. या आरतीत अध्यात्म, भक्ती, शिस्तबद्ध नियोजन, स्वच्छतेची कास आणि तरुणांना अध्यात्माकडे वळविण्याची दिशा असल्यामुळे ही आरती देशभरातील शहरांसाठी प्रेरणास्थान बनली आहे.

नाशिकची गोदा आरती ही केवळ धार्मिक कार्यक्रम नसून स्वच्छता, संस्कार, अध्यात्म आणि समाज एकत्रीकरणाचा राष्ट्रीय आदर्श बनली आहे. नदीप्रेम, वारसा जपण्याची भावना आणि तरुणांना संस्कारित करण्याची समितीचीभूमिका देशभरात कौतुकास्पद मानली जात आहे.

अध्यात्म आणि नदीसेवा हे दोन वारस पुढे चालत रहावेत हा आमचा उद्देश आहे. नाशिकप्रमाणेच इतर शहरांनीही याचा आदर्श घ्यावा. जेथे हवी तेथे मदत करण्यास आम्ही सदैव तयार आहोत. आज देशभरातून येणारी आमंत्रणे पाहून हा अभिमानाचा क्षण असल्याचे रामतीर्थ गोदा सेवा समितीचे मुकुंद खोचे यांनी सांगितले.

ज्या शहरात आरती सुरू होणार आहे, त्या ठिकाणच्या नदीची आणि परिसराची मोठी स्वच्छता मोहीम राबवली जाते. समितीच्या म्हणण्यानुसार प्रत्येक नदीतून तब्बल पाच ट्रॅक्टर कचरा बाहेर काढण्यात आला. रामतीर्थ गोदा सेवा समितीतील १० प्रशिक्षित तरुण संबंधित शहरांत जाऊन १० दिवसांचे प्रशिक्षण तेथील तरुणांना देतात. आरतीची शिस्त, मुद्रेचे महत्त्व संबंधितांना पटवून देतील.

# पत्नीच्या खुनात दोषी ठरलेल्या पतीस जन्मठेप

## जिल्हा सत्र न्यायालयाचा कठोर निर्णय

महासागर | प्रतिनिधी



**अमरावती, ( दि. 25 )** – घरगुती वादातून पत्नीला निर्दयीपणे ठार मारणाऱ्या पतीला अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. दिनेश सुधाकर खेडकर (वय 36, अंजनसिंगी, रा. धामणगाव रेल्वे) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश (कक्ष 5) एस.पी. शिंदे यांनी 25 नोव्हेंबर रोजी हा निकाल दिला. तसेच आरोपीवर 2,000 रुपये दंड आणि दंड न भरल्यास 6 महिन्यांच्या सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

पीडित सविता खेडकर ही पतीच्या सततच्या त्रासाने कंटाळून तीन वर्षांच्या मुलासह घर सोडून धामणगाव येथील वीटभट्टीवर राहत व काम करीत होती. 8 मार्च 2022 रोजी आरोपी तिचा शोध घेत त्या ठिकाणी आला आणि याच ठिकाणी हत्येचा भीषण प्रकार घडला. सविता खोलीत मुलासह विश्रांती घेत असताना आरोपी आत घुसला आणि दोघांमध्ये वाद झाला. काही क्षणांनी भट्टीवरील महिला मजुरांना सविताचे ओरडण्याचे आवाज ऐकू आले. खोलीत धाव घेतली असता आरोपी सवितावर चाकूने वार करत असल्याचे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. गंभीर जखमी झालेली सविता जीव वाचवण्यासाठी बाहेर पळाली, मात्र आरोपीने तिचा पाठलाग करून सपासप वार करून जागीच ठार केले. या संपूर्ण घटनेला भट्टीवरील कामगार आणि पीडितेचे लहान मूलही साक्षीदार होते. या घटनेची माहिती मिळताच वीटभट्टी मालक गणेश आनंदराव गोठाणे यांनी तत्काळ पोलिसांना कळवले. दत्तापुर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक प्रियांका चौधरी यांनी तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. याप्रकरणात सरकारतर्फे एकूण 7 साक्षीदार तपासले गेले. त्यापैकी 4 प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी न्यायालयात आरोपीची ओळख आणि संपूर्ण घटना स्पष्टपणे मांडली.

आरोपीची ओळख परेडही न्यायालयाने ग्राह्य धरली. सर्व पुरावे, वैद्यकीय अहवाल, पंचनामे आणि साक्ष यावरून आरोपीचा गुन्हा निर्विवाद सिद्ध झाल्याचे न्यायालयाने नमूद केले. सरकारतर्फे अतिरिक्त शासकीय अभियोक्ता सोनाली क्षिरसागर यांनी जोरदार युक्तिवाद करत आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध केला. प्रकरणात महिला पोलीस अर्चना डांगे आणि पोलीस कर्मचारी दिलीप सावरकर यांनी सहकार्य केले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे पीडितेला न्याय मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# केमिकल टँकरला अपघातानंतर आग

## सुदैवाने जीवितहानी टळली, टँकरची मात्र राखरांगोळी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.25 )** – मध्यप्रदेशातून अकोला येथे केमिकल घेऊन जाणाऱ्या टँकरचा माहुली जहागीर गावाजवळ मंगळवारी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास अपघात झाला आणि काही क्षणांतच टँकरने पेट घेत भयंकर अग्नीतांडव माजले. काही मिनिटांत संपूर्ण टँकरचा कोळसा झाला असून या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने चालकाने प्रसंगावधान दाखवत जीव वाचवला आणि कोणतीही जीवितहानी झाली नाही. पोलीस तसेच अग्निशमन दलाच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे मोठी दुर्घटना टळल्याची भावना व्यक्त होत आहे.

माहितीनुसार मध्यप्रदेशातून अकोला येथे केमिकल घेऊन येणारा टँकर माहुली जहागीर गावानजीक पोहोचत असताना रस्त्याचे काम सुरू असल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे टँकर रस्त्याच्या कडेला पलटी झाला आणि काही क्षणांतच भीषण स्फोटासह त्याने पेट घेतला. चालकाने योग्य वेळी वाहनातून उडी मारत जीव वाचवला. टँकरमध्ये केमिकल असल्याने आग वाढण्याचा धोका प्रचंड होता. त्यातून परिसरात धुराचे प्रचंड लोट पसरले आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि शर्थीचे प्रयत्न करून आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न सुरू केला. आगीचे प्रमाण तीव्र असल्याने दलाला मोठी कसरत करावी लागली. दरम्यान राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली. दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांचे हाल झाले.





### एमआयडीसी मार्गे वळविली वाहतूक

स्थिती गंभीर व नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता दिसताच माहुली जहागीर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत कडू यांनी तातडीने वाहतूक व्यवस्थापन हाती घेत एमआयडीसी मार्गे वाहतूक वळवली. त्यामुळे महामार्गावरील कोंडी मोठ्या प्रमाणात कमी झाली आणि काही वेळातच वाहतूक सुरळीत करण्यात आली. यावेळी घटनास्थळी नागरिकांची बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. पेटत्या टँकरचे दृश्य पाहण्यासाठी लोकांची धावपळ सुरू होती मात्र पोलिसांनी सतर्कता दाखवत नागरिकांना सुरक्षित अंतरावर ठेवले आणि परिसर सुरक्षित केला. पोलीसांनी या घटनेची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत परिस्थिती नियंत्रणात आणल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत कडू यांनी सांगितले. त्यांनी धूर आणि ज्वाळांमुळे परिस्थिती अत्यंत धोकादायक होती त्यामुळे वाहतूक तातडीने वळवल्याचे आणि घटनास्थळी जमलेली गर्दी दूर करून परिसर सुरक्षित करण्यात आल्याचे सांगितले.

# बिबट्याचा गायीवर हल्ला

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, ( दि. 25 )** – येथील इंदला येथील शेतकरी मोहसीन खान फजले खान पठाण यांची शेतात बांधलेल्या गाभण गाईची बिबट्याने दि.25 सकाळी साडेपाचच्या सुमारास शिकार केली यात गाईसह तिच्या पोटात असलेल्या वासरांचा दुदैवी मृत्यू झाला. घटनेची माहिती शेतकऱ्यांला मिळताच घटनास्थळी वनविभाग अधिकाऱ्यांनी घाव घेऊन पंचनामा केला.शेतकऱ्यांचे शेत इंदला गावातील ग्रामपंचायत कार्यालजवळ असुन शेताला लागूनच जिल्हा परिषद शाळा आहे. परिसरात वनविभाग लागून असुन येथे बिबट व इतर हिंसक प्राण्यांचा वावर नेहमीच असतो याकडे वनविभागाने लक्ष देण्याची गरज असुन हिंसक वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी अजय घुले यांनी केली आहे.



# एसआरपीएफ कॅम्पमध्ये एकाच रात्री 7 क्वार्टर्समध्ये चोरीचा प्रयत्न

## दोन पोलिसांच्या मोटरसायकलची चोरी; परिसरात खळबळ

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 25 )** – चांदूर रेल्वे रस्त्याजवळील राज्य राखीव पोलिस दल (एसआरपीएफ) गट क्र. 9 च्या वसाहतीत 24 नोव्हेंबरच्या मध्यरात्री अज्ञात चोरांनी धुमाकुळ घातला. एकाच रात्री सात पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरात चोरीचा प्रयत्न करण्यात आला. यामध्ये दोन पोलिसांच्या घरासमोर उभ्या असलेल्या दोन मोटरसायकली चोरी करण्यात आली, तर इतर क्वार्टर्समध्ये चोरीचा प्रयत्न मात्र अयशस्वी ठरला. या घटनेने एसआरपीएफ कॅम्प परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे.

एसआरपीएफ परिसरात 24 तास कडक पोलीस सुरक्षा असूनही अज्ञात चोरांनी कॅम्पमध्ये घुसून धाडसाने चोरी केली. पोलिस हवालदार जयंत सोमणकर, सुरेश जोगे या दोघांच्या घरासमोर उभ्या असलेल्या दोन दुचाकी चोरांनी लंपास केल्या. तसेच अनुप खंदालकर, शुभम दाभेराव, रोशन कौरती, कर्मचारी कदम, ठाकरे या कर्मचाऱ्यांच्या घरात चोरीचा प्रयत्न झाला, मात्र चोरांना मोठा हात लागला नाही.

**फिंगरप्रिंट तज्ञ व डॉग स्क्वॉड दाखल**

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकाऱ्यांसह फ्रेजरपुरा पोलिस, क्राइम ब्रांचचे पथक, फिंगरप्रिंट एक्स्पर्ट आणि डॉग स्क्वॉडसह घटनास्थळी दाखल झाले आणि तपास सुरु केला.



एसआरपीएफ कमांडंट यांनीही घटनास्थळाचा पाहणी दौरा केला. कडक सुरक्षेसाठी ओळखल्या जाणाऱ्या या कॅम्पमध्येच चोर शिरल्याने मोठे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. सुरक्षित व संरक्षित मानल्या जाणाऱ्या पोलीस वसाहतीतील घडलेल्या या धाडसी घटनेने परिसरात तीव्र चिंता निर्माण झाली असून पोलीस तपास सुरू आहे.

# आनंद सोहळ्यात पसरले दु:खाचे सावट

## पुसला गावात नवरदेवाचा हृदयविकाराने मृत्यू

महासागर | प्रतिनिधी



**वरुड, ( दि.25 )**– तालुक्यातील पुसला गावात विवाहसोहळ्याच्या आनंददायक वातावरणावर दुःखाची छाया पसरवणारी हृदयद्रावक घटना मंगळवारी घडली. गावातील कोतवाल अमोल मनोहरराव गोडबोले (वय 30) यांचा विवाह मोवाड येथील तरुणीसोबत पार पडत असताना अचानक नवरदेव तरुणाला हृद्यविकाराचा झटका आल्याने त्यातच त्याचा मृत्यू झाला. कुटुंबीय, नातेवाईक आणि गावकरी नव्या आयुष्याच्या शुभारंभाचा आनंद साजरा करत असतानाच नियतीने ही क्रूर विडंबना केली.

दुपारी साडेतीनच्या सुमारास विठ्ठल-रुक्मिणी मंदिर सभागृहात अमोल यांची प्रकृती अचानक बिघडली. काही क्षणांतच ते कोसळले. तातडीने वरूड येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती डॉक्टरांनी दिली. शवविच्छेदनानंतर त्यांचे पार्थिव पुसला येथे आणण्यात येताच संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले. कर्तव्यनिष्ठ, मनमिळाऊ स्वभाव आणि सर्वांना जोडून ठेवण्याची वृत्ती यामुळे अमोल गोडबोले गावातील सर्वांचे लाडके होते. लग्नासाठी जमलेले तेच हात अखेरीस त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी पुढे येतील, हे वास्तव कुटुंबीय आणि गावकऱ्यांना असह्य झाले आहे. या घटनेने तरुण वयात वाढत्या हृदयविकाराच्या घटनांकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले आहे. ताण, जीवनशैलीतील बदल आणि आरोग्य तपासणीकडे दुर्लक्ष याबाबत समाजाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. एका आनंदसोहळ्याची जागा अशी दुःखाचे सावट घेईल, असे स्वप्नातही न वाटणारे हे दु:ख सर्वांना व्यथित करून गेले.

# लिपिक वर्गीयांची जम्बो खांदेपालट मात्र ‘मलाईदार’ टेबलवर कायम तेच चेहरे!

## पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह; महापालिका आयुक्तांची ‘मेहर नजर’कुणावर ?

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.25 )** – शहर महापालिकेत दीर्घकाळानंतर वरिष्ठ व कनिष्ठ लिपिकांची जम्बो खांदेपालट करण्यात आली असली तरी, प्रत्यक्षात ‘मलाईदार’ मानल्या जाणाऱ्या विभागांमध्ये मात्र कोणताही लक्षणीय बदल झालेला नाही. स्वच्छता, लेखा-परीक्षण, सामान्य प्रशासन, बांधकाम, उद्यान आणि आरोग्य विभागांवर वर्षानुवर्षे बसलेले तेच लिपिक पुन्हा एकदा आपल्या जागेवर कायम राहिल्याने कर्मचारी वर्गात नाराजीची लाट उसळली आहे. नियमांनुसार प्रत्येक कर्मचाऱ्याची तीन वर्षांनी बदली बंधनकारक असताना, काही निवडक लिपिकांवरच हा नियम लागू नसल्याची चर्चा जोरात आहे. ‘बदलीचा झटका सगळ्यांना बसतो, पण काही टेबलांवर मात्र कायम मेहरबानी असते,’ अशी कुजबुज महापालिका वर्तुळात सुरू आहे. आयुक्तांची ‘मेहर नजर’ नेमकी कुणावर आणि



का ?, याबाबत कर्मचारी व नागरिक दोघांतही प्रश्न उपस्थित होत आहेत. या बदल्यांमुळे प्रशासनात हालचाल जाणवली असली तरी पारदर्शकतेचा सुगंध मात्र जाणवत नसल्याची भावना व्यक्त होत आहे. काहींना राजकीय पाठबळ, तर काहींना वरिष्ठांचे वरदहस्त असल्याच्या चर्चा शहरात रंगू लागल्या आहेत.महापालिकेतील बदली प्रक्रिया खरंच निष्पक्ष आहे का ? की काही टेबलं पुढेही ‘अस्पृश्य’ राहणार आहेत ? आता मोठा प्रश्न आहे. जम्बो खांदेपालटीनंतरही शहरात ‘जुनेच चेहरे नवे आदेश’अशीच चर्चा सुरू असून, पुढील काही दिवसांत प्रशासन पारदर्शकतेचा कस कसा लावते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विवाहाचे आमिष दाखवून महिलेचे शोषण; बिल्डर खेडकर फरार

**अमरावती, ( दि. 25 )**– शहरातील एका 50 वर्षीय बिल्डरने विवाहाचे आमिष दाखवत एका विवाहित महिलेचे तब्बल आठ वर्षे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. गाडगेनगर येथील मंगेश खेडकर (वय 50) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता व आर्म्स ?क्टअंतर्गत गंभीर गुन्हे नोंद झाले असून आरोपी फरार आहे. 2012 मध्ये एका क्लबमध्ये दोघांची ओळख झाली. समाजातील प्रभाव व उच्च संपर्क असल्याचे भासवून खेडकरने महिलेवर विश्वास संपादन केला. 2019 मध्ये विवाहाचे आश्वासन देत त्याने अनैतिक संबंध प्रस्थापित केले. नंतर कपटीपणे महिलेचे अश्लील फोटो-व्हिडिओ काढून त्यांचा गैरवापर करण्याची धमकी देत ब्लॅकमेलिंग सुरू केले. पीडितेच्या साईनगर येथील जिजाऊ बँक खात्यातून आरोपीने कोट्यवधी रुपयांची हालचाल केली. जमा असलेले पाच लाख स्वत:कडे घेतले, तसेच पीडितेचा फ्लॅट आपल्या नावावर करण्यासाठी दबाव आणल्याचे तक्रारीत नमूद. 15 नोव्हेंबर रोजी आरोपीने शस्त्रासह घरी जाऊन पीडिता व तिच्या मुलीला ठार मारण्याची धमकी दिल्याचा उल्लेख आहे. त्याच्याकडे असलेल्या शस्त्राचा परवाना कोणत्या नावावर मंजूर झाला याबाबत चौकशी सुरू आहे.

# अंजनगाव सुर्जी निवडणुकीत न्यायालयीन निकालांचा प्रभाव

## तीन महत्वपूर्ण अपीलांवर दिवाणी न्यायालयाचे आदेश

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, ( दि.25 )** –नगरपरिषद निवडणूक 2025 च्या पार्श्वभूमीवर दर्यापूर येथील कनिष्ठ स्तरावरील दिवाणी न्यायालयाने तीन महत्वाच्या निवडणूक अपीलांवर निर्णय देत उमेदवारी अर्जांबाबत महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत.

प्रभाग क्र. 6 (अ) साठी शिवसेना (उबाठा) पक्षाकडून उमेदवार असलेल्या श्रीमती झाकिया परवीन मो. राझिक यांचा मंजूर उमेदवारी अर्ज Election Appeal No. 01/2025 वर सुनावणी करताना न्यायालयाने रद्द ठरवला आहे. परिणामी त्यांचे नामनिर्देशन नामंजूर करण्यात आले असून त्या या प्रभागातून निवडणूक लढण्यास अपात्र ठरल्या आहेत.

प्रभाग क्र. 7 (ब) चे वंचित बहुजन पक्षाचे उमेदवार श्री सय्यद अझहरुद्दीन सय्यद अमीनुद्दीन यांचा पूर्वी नामंजूर झालेला अर्ज Election Appeal No. 02/2025 वर न्यायालयाने पुन्हा मंजूर केला आहे. त्यामुळे ते उमेदवारीस पात्र ठरले असून वंचित बहुजन पक्षाकडून निवडणूक रिंगणात



कायम राहणार आहेत.

अध्यक्ष पदासाठी वंचित बहुजन पक्षाचे उमेदवार आकाश सुखदेव राऊत यांचा नामंजूर अर्ज Election Appeal No. 03/2025 वर न्यायालयाने वैध ठरवला असून त्यांची उमेदवारी पुनर्स्थापित केली आहे. या निर्णयांनंतर अध्यक्षपदासाठी पात्र उमेदवारांची संख्या 7 वर पोहोचली आहे. तसेच आता नगरपरिषद निवडणुकीत एकूण अध्यक्ष – 7 आणि सदस्य – 173 उमेदवार स्पर्धेत राहणार आहेत. न्यायालयीन आदेशांमुळे निवडणुकीचा राजकीय रंग आणखी गडद झाला आहे.

# नगर पंचायत निवडणुकीत ‘घराणेशाही’चे वारे जोरदार

## निष्ठावंत कार्यकर्त्यांची उपेक्षा, असंतोषाची लाट उसळली

महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, ( दि.25 )** – नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत निवडणुकीच्या उमेदवारी जाहीर होताच शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. सर्वच पक्षांच्या पहिल्या याद्यांमध्ये पक्षनिष्ठ, दीर्घकाळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची उघडपणे उपेक्षा झाल्याचे स्पष्ट चित्र दिसत असून, यावरून कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजीची लाट उसळली आहे.



नगर पंचायतीतील 17 प्रभागांपैकी अनेक ठिकाणी नवराङ्कबायको, दीरङ्कवहिनी, भावकीतील उमेदवारांना तिकिटे देऊन पक्षांनी उघडपणे घराणेशाहीला प्रोत्साहन दिल्याची चर्चा आहे. त्यामुळे मतदारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. वर्षानुवर्षे पक्षासाठी राबणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांनी या निर्णयाला विरोध दर्शवला आहे. आम्ही रात्रंदिवस पक्षासाठी काम करायचे आणि उमेदवारी मात्र घरातील लोकांना ? मग आम्ही आहोत तरी कशासाठी ? असा संताप व्यक्त होत आहे. या असंतोषामुळे काही ठिकाणी स्वतंत्र उमेदवारीची चर्चा अधिकच वेग धरत आहे.

### ठेकेदार, मटका, दारू अश्या अवैध धंद्यावर प्रश्नचिन्ह

काही पक्षांनी ठेकेदार, दारू दुकानदार, बियर बार मालक किंवा अवैध धंद्याशी संबंधित व्यक्तींना उमेदवारी दिल्याची चर्चा शहरभर रंगली आहे. यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

### या शहरात प्रामाणिक कार्यकर्ते नाहीत काय ?

पक्षांतरित व्यक्तींना तातडीने तिकीट देण्यात आल्याने वर्षानुवर्षे निष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा संताप शिगेला पोहोचला आहे. ‘निष्ठा व्यर्थ, स्वार्थच सर्वकाही’ अशी भावना बळावली आहे. ‘घराणेशाही, पैशाचा प्रभाव आणि निष्ठावंतांची उपेक्षा—हे सर्व लक्षात घेऊन मतदारांनी सुजाणपणे मतदान करावे,’ असे सामाजिक संस्थांचे आवाहन. या असंतोषामुळे स्थानिक राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता असून, नाराजांची तटबंदी आणि स्वतंत्र उमेदवारांमुळे निवडणूक अधिक चुरशीची होणार, अशी चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# चोरीच्या वाढत्या घटनांवर अंकुश लागणार


- अमरावती पोलिसांचा गस्ती वाढवण्याचा निर्णय
- वरिष्ठ अधिकारी नागरिकांशी साधत आहेत संवाद

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 25 )** – शहरात गेल्या काही दिवसांमध्ये घरफोडी, मोबाइल स्नॅचिंग आणि महिलांच्या मंगळसूत्र चोरीच्या घटना वाढल्याने अमरावती पोलिसांनी गंभीर दखल घेतली आहे. गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यासाठी पोलिसांनी दिवसासह रात्रीचीदेखील गस्त वाढवली आहे. तसेच चोरीप्रवण भागांमध्ये स्वत: पोलिस उपायुक्त गणेश शिंदे नागरिकांशी संवाद साधत असून, घरफोडीसारख्या प्रकारांपासून कसे बचाव करता येईल याबाबत मार्गदर्शन करीत आहेत.

राजापेठ, बडनेरा, गाडगेनगर, नांदगाव पेठ या पोलिस ठाण्यांच्या हद्दीत अलीकडे चोऱ्यांच्या घटना वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर संवेदनशील भागात अतिरिक्त गस्त पथके तैनात करण्यात आली आहेत. साईनगर येथील खंडेलवाल नगरासह विविध परिसरात पोलिस पथके गस्त घालत आहेत. मोटर पेट्रोलिंग युनिटलाही सतर्क राहण्याचे आदेश दिले गेले आहेत. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. रात्री बंद घर, दुकाने आणि निर्मनुष्य भागांवर विशेष लक्ष ठेवले जात आहे. नागरिकांनी देखील सतर्क राहावे, संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित पोलीस नियंत्रण कक्ष किंवा जवळच्या पोलीस ठाण्याला कळवावे, अशी पोलिसांची विनंती आहे. वाढीव गस्त आणि जलद कारवाईमुळे शहरातील गुन्हेगारीवर लवकरच नियंत्रण येईल, असा पोलिसांचा दावा आहे. सोमवारी पोलिस उपायुक्त गणेश शिंदे यांनी साईनगर परिसरात नागरिकांशी बैठक घेतली. ट्रिपल सीट मोटारसायकल, चेहऱ्यावर ओढणी बांधून फिरणे, पोलिस पाहिल्यानंतर अचानक यू-टर्न घेणे अशा संशयास्पद हालचालींवर पोलिसांकडून तपासणी करण्यात येत आहे.

# पडद्यावरचा ही मॅन काळाच्या पडद्याआड



चित्रपटातून पदार्पण झाले. पुढे धर्मेंद्रने मागे वळून पाहिले नाही आणि नायक ते सुपरस्टार असा यशस्वी प्रवास त्यांनी गाठला. १९८० च्या दशकात धर्मेंद्रने केलेले शोले, सीता और गीता, चुपके चुपके, अनपढ़, सत्यकाम, बंदिनी, हकीकत, यादों की बारात, धरमवीर, ड्रीम गर्ल, राम और श्याम असे अनेक चित्रपट आजही लोकांच्या मनात जिवंत आहेत.

त्यांच्या डोळ्यांतील प्रेमळ चमक, खळखळून हसणारा चेहरा आणि न्यायासाठी लढणारा प्रामाणिक माणूस हा त्यांच्या अभिनयाचा गाभा होता.

हिंदी चित्रपटसृष्टीत अनेक नायक आले, चमकले आणि लोप पावले, पण काही चेहरे असे आहेत जे काळाच्या ओघातही फिके पडत नाहीत. त्यांपैकी एक नाव म्हणजे धर्मेंद्र. ही-मॅन ऑफ बॉलीवुड म्हणून प्रसिद्ध झालेला हा कलाकार केवळ पडद्यावरील नायकच नव्हते, तर माणूस म्हणूनही एक हृदयस्पर्शी व्यक्तिमत्त्व होते.

धर्मेंद्र यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी पंजाबमध्ये झाला. पंजाबच्या लुधियाना जिल्ह्यातील छोट्या खेड्यात जन्मलेला धर्मसिंह देओल म्हणजेच आपला धर्मेंद्र, यांचे बालपण साध्या कुटुंबात गेले. त्यांचे वडिलोपार्जित गाव लुधियानातील पखोवाल तहसील रायकोट जवळील डांगो आहे. त्यांच्या मनात मोठं स्वप्न होतं, चित्रपटसृष्टीत नायक होण्याचं फिल्मफेअर टैलेंट हंट मधून त्यांना मुंबई गाठायची संधी मिळाली आणि तिथून सुरू झाली अभिनयाची सुरुवात, एका स्वप्नाची कहाणी आणि एक अविस्मरणीय प्रवास.

१९६० मध्ये दिल भी तेरा हम भी तेरे या

वीरू म्हणून तो लोकांच्या हृदयात कायमचा घर करून बसला. धर्मेंद्र यांची खरी ओळख म्हणजे त्यांचं साधेपण आणि माणुसकी. गावाकडच्या भाषेत बोलणारा हा अभिनेता लाखो चाहत्यांच्या गर्दीतही आपला माणूस म्हणून ओळखला जायचा.

त्यांच्या मुलगा सनी आणि बॉबी देओलसह त्यांनी जपलेले कौटुंबिक मूल्य आजच्या चमकदार दुनियेतही आदर्श ठरतात. जमिनीशी जोडलेला हा माणूस, अखेरपर्यंत आपल्या शेतात काम करायचा, झाडं लावायचा आणि निसर्गाशी संवाद साधायचा, हेच त्यांचं खरे तेज होते. सत्यकाम या चित्रपटात त्यांनी साकारलेला सत्यनिष्ठ अभियंता असो वा शोलेतील हसरा वीरू, प्रत्येक भूमिकेतून धर्मेंद्रने भारतीय समाजातील भावनिक ताण-तणाव आणि आशा-आकांक्षा जिवंत केल्या.

त्यांच्या अभिनयात एक माणूस दिसतो, रडणारा, हसणारा, प्रेम करणारा, संघर्ष करणारा पडद्यापलीकडचा नायक, संवेदनशील मनाचा कलाकार आणि पडद्यावरचा वीरू आणि जीवनातला सच्चा वीर धर्मेंद्र!



धर्मेंद्र वयाच्या नवव्या दशकात असतानाही त्यांच्या चेहऱ्यावर तीच कोमलता, तेच स्मित दिसायचे. त्यांचे ट्वीट्स, त्यांचे आठवणींनी भरलेले व्हिडिओ, अजूनही चाहत्यांना जीवनाकडे सकारात्मकतेने पाहायला शिकवतात. धर्मेंद्र हे फक्त अभिनेता नव्हते तर ते एक भावना होते.

त्यांचा प्रवास म्हणजे मेहनतीचा, प्रामाणिकतेचा आणि माणुसकीचा विजय. आजच्या नव्या पिढीला धर्मेंद्रकडून शिकण्यासारखे खूप काही आहे की, नायक होण्यासाठी पडद्यावर लढणं पुरेसं नाही, जीवनातही माणुसकीने जगणं गरजेचं असतं.

ते एक कुशल अभिनेते, चित्रपट निर्माता आणि राजकारणी राहिलेत. त्यांनी बिकानेर येथून खासदार म्हणून काम केले आणि १५ व्या लोकसभेचे सदस्य होते. २०१२ मध्ये या ज्येष्ठ अभिनेत्याला भारत सरकारने पद्मभूषण, तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान केला. धर्मेंद्र हे भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात प्रिय सुपरस्टारपैकी एक होते, त्यांनी ३०० हून अधिक चित्रपट इंडस्ट्रीला दिले आणि या वयातही ते अभिनयात सक्रिय राहिले.

जवळपास सहा दशके हिंदी चित्रपट सृष्टीत काढून अनेक सूपरहिट चित्रपट देणारा हा हसऱ्या चेहऱ्याचा नायक सोमवारी सर्वांना सोडून अखेरच्या प्रवासाला निघून गेला. बॉलीवुडच्या ही मॅनला भावपूर्ण श्रद्धांजली.

■ ■ ■



बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी सोमवार २४ नोव्हेंबर रोजी निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावलेली होती. त्यांना रुग्णालयात देखील दाखल करण्यात आलं होतं. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर धर्मेंद्र यांच्यावर घरीच उपचार सुरु होते. तेव्हा मित्राला भेटण्यासाठी अभिनेते शत्रुघ्न सिन्हा त्यांच्या घरी पोहोचले होते. आजारी असताना देखील धर्मेंद्र हँडसम दिसत होते, असं वक्तव्य करीत शत्रुघ्न सिन्हा यांनी एक्सवर एक भावूक पोस्ट शेअर केली आहे.

धर्मेंद्र आणि शत्रुघ्न सिन्हा या दोघांनी लोहा, जीने नहीं दूंगा, ब्लॅकमेल, आग ही आग, हमसे ना टकराना यांसारख्या अनेक सिनेमांमध्ये काम केलं आहे. शत्रुघ्न सिन्हा यांनी धर्मेंद्र यांच्या निधनावर दुःख व्यक्त करीत पोस्टमध्ये लिहले की, जेव्हा आमची जोडी एकत्र चालायची तेव्हा आम्ही ब्यूटी अन्ड द बीस्ट दिसायचो जेव्हा मी आणि माझी पत्नी त्यांना भेटण्यासाठी त्यांच्या घरी गेलेलो तेव्हा ते हसत होते. त्यांच्या चेहऱ्यावर तेज होते ते बरे होतील असं वाटलं होतं, असा विचार देखील नव्हता करायचा ज्यावर आपण इतकं प्रेम करतो, तो या विश्वातून जाईल...

आमचे फॅमिली फ्रेंड, माझे मोठे भाऊ, लोकांचे हिरो, सर्वांचे चाहते, जमिनीचे पूत्र पंजाब आणि महाराष्ट्राची शान खऱ्या अर्थाने भारत रत्न, जमिनीशी जोडलेले, दयाळू आणि विनम्र धर्मेंद्र यांच्या निधनाने प्रचंड दुःख झाले.. त्यांचं योगदान कायम लक्षात ठेवलं जाईल.. शत्रुघ्न सिन्हाची ही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## वीरूच्या निधनाने खचले बीग बी



जेव्हा जेव्हा धर्मेंद्र आणि अमिताभ बच्चन एकाच मंचावर दिसले, तेव्हा लोकांना जय-वीरूच्या जोडीची आवर्जून आठवण आली. हिंदी चित्रपटसृष्टीतील ही सर्वात लोकप्रिय जोडी होती. शोले या चित्रपटात ही जोडी पहिल्यांदा एकत्र दिसली. धर्मेंद्र यांच्या निधनानंतर आता अमिताभ बच्चन एकटे पडले आहेत. जिगरी दोस्त अमिताभ बच्चन हे त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी स्मशानभूमीवर पोहोचले होते. अंत्यसंस्कार पार पडल्यानंतर बिग बींनी सोशल मीडियावर भावूक पोस्ट लिहिली.

वीरुच्या आठवणीत त्यांनी लिहिलं, ह्यआणखी एक धाडसी आख्यायिका आपल्याला सोडून गेली आहे. एक असह्य शांतता मागे सोडून गेली आहे. धरमजी.. महानतेचे प्रतीक.. केवळ त्यांच्या प्रतिष्ठेसाठीच नाही तर त्यांच्या मनातील विशालता आणि अत्यंत प्रेमळ, साधेपणासाठी ते कायम लक्षात राहतील. पंजाबच्या गावच्या मातीतील सुगंध त्यांनी आपल्यासोबत आणला होता आणि त्या मातीशी ते कायम प्रामाणिक राहिले. ही इंडस्ट्री प्रत्येक दशकात बदलत होती, पण ते कधीच बदलले नव्हते. त्यात त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली होती. त्यांचं हास्य, त्यांच्या स्वभावातील उब, त्यांचं आकर्षण सभोवतालच्या प्रत्येकापर्यंत पोहोचली. हे या इंडस्ट्रीत फार दुर्मिळ आहे. त्यांच्या जाण्याने आयुष्यात एक पोकळी निर्माण झाली आहे.

अमिताभ बच्चन यांनी धर्मेंद्र यांच्यासोबत अनेक चित्रपटांमध्ये काम केलं होतं. परंतु जय-वीरू या जोडीसाठीच दोघं खास ओळखले जातात. धर्मेंद्र यांचा शेवटचा चित्रपट येत्या २५ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात त्यांनी अमिताभ यांचा नातू अगस्त्य नंदासोबत काम केलंय. बिग आणि धर्मेंद्र हे केवळ चित्रपटांमध्येच नाही तर एकाच मंचावर आणि एकाच फ्रेममध्ये अनेकदा एकत्र दिसले. सोशल मीडियावर धर्मेंद्र आणि अमिताभ बच्चन यांचा एक जुना व्हिडीओसुद्धा व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये धर्मेंद्र म्हणतात, अमिताभ माझ्या धाकट्या भावासारखा आहे. देव त्याला दीर्घायुष्य देवो. हे ऐकून बिग बी भावूक होतात. ही जोडी कायम लक्षात राहिल.

## पर्यावरण संरक्षणाची नितांत गरज

जग विनाशाकडे वाटचाल करीत आहे. याकरिता जगाने पर्यावरणाचे संतुलन ठेवून संरक्षण करण्याची गरज आहे. वाढते प्रदुषण रोखण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. पर्यावरणाची सुरक्षा व संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रानी पर्यावरणाच्या प्रती वैश्विकस्तरावर आणि राजनितीक व सामाजिक जागृती आणण्याकरिता २६ नोव्हेंबर १९९२ ला विश्व पर्यावरण संरक्षण दिवस साजरा करण्याची सुरुवात केली.

आज संपूर्ण जग सुरक्षीत रहावे असे सर्वांना वाटते. परंतु मानवांच्या अतिरेकामुळे जंगलतोड, रेती खणन, सोने, धातु, चांदी, हिरे, कोळसा व खनिज संपत्ती इत्यादीवर प्रहार करून निसर्गाच्या मुळावरच घाव केल्याचे दिसून येते. यामुळे निसर्गाचे संतुलन बिघडले आहे. पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येईल याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे.

भारतात जंगल, पशु-पक्षी व प्राणी यांना सरकारकडुन संरक्षण मिळावे यासाठी २६ मार्च १९७४ ला गढवाल मधील हेनवलघाटी येथे गौरादेवी यांच्या नेतृत्वाखाली चिपको आंदोलनास सुरुवात झाली. आज प्रदुषण प्रचंड वाढले असून, पक्षांचे जगणे कठीण झाले आहे. संपूर्ण जगात जंगल तोड मोठ्या प्रमाणात होत आहे. जगातील वाढती लोकसंख्या ही पर्यावरण नियंत्रण ठेवण्यास मोठी अडचण आहे. पर्यावरणाचा आधारस्तंभ वृक्ष आहे व त्याला साथ हवी जल व वायूची. परंतु हे संपूर्ण दुषित झाल्यामुळे पर्यावरण धोकादायक स्थितीत येवून पोहोचले आहे.

पर्यावरणाच्या ढासळत्या परिस्थितीमुळे जगातील १० लाख प्राणी व वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. ज्या पक्ष्यांवर पर्यावरणाची धुरा आहे ते गिधाड पक्षी संपुष्टात येत आहे. मानवाने वृक्ष कटाईच केली नाही तर वृक्षांना जळामुळासकट उपटून फेकले. आज औषधोपयोगी वनस्पती नष्ट होत आहेत. वाढत्या प्रदूषणामुळे ३० टक्के वृक्षप्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत आणि विविध देशांतील १४२ प्रजाती आधीच पृथ्वीतलावरून लुप्त झाल्या आहेत.

भारतात वृक्षांच्या २६०३ प्रजाती आहेत यातील ४६९ प्रजाती धोकादायक स्थितीत आहेत. पर्यावरणाचे संतुलन विस्कळीत झाल्यामुळे जंगलातील संपूर्ण प्राणी शहरात व गावात प्रवेश करतांना दिसतात. यामुळे जिवीत हाणीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. जंगली प्राणी व मानव यांच्यात मोठ्या प्रमाणात शत्रुत्व दिसून येते. जंगल संपदा नष्ट होत आहे. जंगल तोडीमुळे अनेक प्राण्यांच्या व पक्षांच्या प्रजाती लुप्त होतांना दिसते किंवा त्यांची शिकार होतांना दिसते. त्यामुळे आज पर्यावरणाचे संरक्षण करण्याची प्रथम जबाबदारी मानवजातीची आहे.

प्लास्टीकनेसुध्दा पर्यावरणाला प्रदुषित केल्याचे दिसून येते. जगात विश्व शांतीसाठी पर्यावण वाचविण्याची गरज आहे. मानवजातींमध्ये वाढते आजार, व्याधी व आरोग्याची ढासळती परिस्थिती ह्या सर्व पर्यावरणाच्या बिघडत्या संतुलनामुळे दिसून येतात. यामुळे मानवाचे आयुष्यमान दिवसेंदिवस कमी होत आहे. जगात वाढते कारखाने आणि जगातील युध्दसामुग्रीची शर्यत व अनेक परमाणु परिक्षण यामुळे संपूर्ण जग प्रदुषित होत आहे. भारताची राजधानी दिल्ली प्रदुषणाच्या बाबतीत जगात प्रथम क्रमांकावर असल्याचे सांगितले जाते. प्रदुषणामुळे दिल्ली गॅसचेंबर बनले की काय असे वाटते. दिल्लीमध्ये मास्क युग आले की काय असे वाटते.

संयुक्त राष्ट्राने १९९२ ला पर्यावरण संरक्षण करण्याची संकल्पना जाहीर केली होती. परंतु याबद्दल किती देश अलर्ट, सतर्क आहेत? पर्यावरण संरक्षण करण्याची घोषणा करणे वेगळे आहे. आज संपूर्ण जग बारूदच्या ढिगाऱ्यावर बसलेले आहे. अझरबैजान-आर्मेनिया युद्ध आणि गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध आणि आता सुरू असलेले हमास-हिजबुल्ला विरूद्ध इस्त्रायलचे भयावह युद्ध. त्यामुळे मानवजातीने आपल्या मृत्यूचीही व्यवस्था केल्याचे दिसून येते.

मानवजातीने आता पर्यावरण वाचवीले नाही तर पृथ्वीचा विनाश अटळ आहे. याकरिता जगातील संपूर्ण देशांनी विश्र्व पर्यावरण संरक्षण दिवसाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविला पाहिजे. लोकसंख्येवर नियंत्रण असणे गरजेचे आहे, वाढते शहरीकरण थांबवीले पाहिजे, कारखान्यांतील धुळ व दुषित पाणी यांचा बंदोबस्त केला पाहिजे, अनेक वाहन दुषित धुर ओकतात. ते कुठेतरी थांबवले पाहिजे.

आज पर्यावरण विस्कळीत झाल्यामुळे व प्रदुषणामुळे मानवजातीवर आरोग्याचे संकट ओढवले आहे. कॅन्सर, टीबी, मधुमेह, हार्ट अटॅक, डोळ्यांचा त्रास इत्यादीसह अनेक व्याधी वाढल्यात. भारताने पर्यावरण संरक्षणासाठी युध्दपातळीवर कार्य करण्याची गरज आहे.

गेल्या ५ ते १० वर्षांपासून जगात अनेक महाप्रलय, सुनामी, ग्लेशीअर वितळणे, अती पाऊस, अती उष्णता, अती थंडी, वनवे लागुन जंगल संपदा जळुन खाक होणे, भुकंप येणे, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने व पर्यावरणाची खुली हत्या केल्याने घडत आहेत. त्यामुळे पर्यावरणाला वाचविण्याकरिता जगातील संपूर्ण देशांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे.

भारतात शहरांचे सौंदर्यीकरण करण्याच्या उद्देशाने जंगल तोड करणे योग्य नाही. सरकारने जंगल तोड ताबडतोब थांबवली पाहिजे. यामुळे पर्यावण शुद्ध राहील. ओसाड जागेवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करायला पाहिजे. २६ नोव्हेंबर पर्यावरण संरक्षण दिवसाचे औचित्य साधून या दीवशी प्रत्येकाने आपल्या घरासमोर एकतरी झाड लावावे, जागा नसेल तर एखाद्या कुंडीत झाड लावावे व पर्यावरणाचे संरक्षण करावे .

सरकारने घर तेथे झाड ही मोहीम राबविली पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे गुरांना चारा, पक्षांना आणि मानवाला फळ व सर्वांना सावली आणि ऑक्सिजन मिळेल, यांच्या संगमाने शुध्द हवा मिळुन पर्यावरणात आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. त्या अनुषंगाने सर्वांनी पावले उचलली पाहिजे.

पर्यावरण सुरक्षीत तर पृथ्वी सुरक्षित,पृथ्वी सुरक्षित मानव, पशु-पक्षी सुरक्षित हेच धेय्य पुढे ठेवून पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे. आजच्या अत्याधुनिक युगात मोबाईल टॉवर मोठ्या प्रमाणात दिसून येते, यामुळे सुध्दा पर्यावरणावर विपरीत परिणाम होतांना दिसतो. यावर नियंत्रण आणण्याची गरज आहे. साडे तिनशे वर्षांपूर्वी संत तुकाराम महाराजांनी निसर्गाचे, पर्यावरणाचे आणि झाडांचे महत्व आपल्या अभंगातून सांगितले होते आणि त्याचे आज अनुकरण होण्याची गरज आहे.

*वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे !*
*पक्षी सुस्वरे आळविता !!*
*येणे सुख रूचे एकांताचा वास !*
*नाही गुणदोष अंगीयेता !!*



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

■ ■ ■

# या जगात शुद्ध पर्यावरणापेक्षा काही महत्त्वाचे आहे का?

जागतिक पर्यावरण संरक्षण दिन विशेष
२६ नोव्हेंबर २०२५



डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

पर्यावरण हा जीवनाचा आधार आहे, जर पर्यावरण सुरक्षित असेल तरच समस्त सजीवांचे संवर्धन शक्य आहे. आपल्या सभोवतालच्या वातावरणात आवश्यक घटकांची उपस्थिती ही पर्यावरणाचा एक अमूल्य भाग आहे, जसे की हवा, पाणी, सूर्यप्रकाश, पर्वत, नद्या, समुद्र, जंगले, झाडे, वनस्पती, प्राणी, पक्षी, जमीन, आकाश, धातू, खनिजे, हिमखंड आणि इतर एकत्रितपणे पर्यावरणात महत्त्वाची भूमिका बजावतात आणि पृथ्वीवर जीवन शक्य करतात. हे घटक एकमेकांना पूरक आहेत आणि आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूवर परिणाम करतात.

पर्यावरण आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे; त्याचे रक्षण करणे म्हणजे मानवी जीवनाचे रक्षण करणे. तथापि, निष्काळजीपणा, दूरदृष्टीचा अभाव आणि स्वार्थामुळे, आपले पर्यावरण वेगाने नष्ट झाले आहे. परिणामी, प्राणघातक आजारांचा प्रसार झपाट्याने झाला आणि अकाली मृत्यूचे प्रमाण नाटकीयरित्या वाढले आहे. आजार आता वयावर आधारित नाहीत, तर प्रदूषण आणि खराब जीवनशैलीवर आधारित आहेत.

आज देशात निरोगी, आनंदाने आणि शांततेने जगण्यासाठी शुद्ध हवा, पाणी, पौष्टिक अन्न आणि आल्हाददायक वातावरण मिळणे दुर्मिळ होत चालले आहे. या समस्येबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि पर्यावरणाला वाचवण्यासाठी, दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी जगभरात जागतिक पर्यावरण संरक्षण दिन साजरा केला जातो.

आपल्या देशात पाश्चात्य देशांपेक्षा प्रदूषण, निष्काळजीपणा, बेजबाबदारपणा, जागरूकतेची कमी, गुन्हेगारी, स्वार्थ आणि सहन करण्याची सवय खुप जास्त आहे. आपल्या सभोवतालचे छोटे देशही पर्यावरण संरक्षणात आपल्यापेक्षा पुढे आहेत. उदाहरणार्थ, भूतान आपले नैसर्गिक सौंदर्य जपून पुढे जात आहे, जे त्याच्या नागरिकांच्या आरोग्यात देखील दिसून येते. विकसित देशांमध्ये पर्यावरणाचे नुकसान रोखण्यासाठी कठोर नियम आणि कायदे काटेकोरपणे अंमलात आणले जातात. तेथील सरकार पर्यावरण संरक्षणाबाबत कठोर दृष्टिकोन बाळगते आणि जनतेची गैरसोय होऊ नये यासाठी विशेष काळजी घेतली जाते आणि विविध संभाव्य पर्यायांची अंमलबजावणी केली जाते. अशा वातावरणात, पर्यावरण आणि आरोग्य सुधारण्यासाठी सरकारच्या प्रयत्नांना जनता पूर्णपणे पाठिंबा देते.

या तुलनेत, आपण अजूनही मागे असल्याचे दिसून येते. स्वच्छ पर्यावरण हे जीवनासाठी सर्वात आवश्यक आहे. तरीही आपण अजूनही पर्यावरणाचा नाश करण्यास नेहमी तयार असतो. अनेकदा असे दिसून येते की जागरूकता केवळ खास दिवसांवर आणि दिखाव्यासाठी केली जाते.

आपल्या शहरांमधून वाहणाऱ्या नद्या अधिकाधिक नाल्यांसारख्या झाल्या आहेत. अब्जावधी रुपये खर्च करूनही नद्या स्वच्छ केल्याच्या दाव्यांमागील सत्य आपल्याला दिसते. भ्रष्टाचार आणि लपवाछपवीमुळे पर्यावरणाचा झपाट्याने नाश होत आहे.

स्विस कंपनी आयक्यूएअरने प्रसिद्ध केलेल्या जागतिक वायु गुणवत्ता अहवाल २०२४ मध्ये भारताला जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वाधिक प्रदूषित देश म्हणून स्थान देण्यात आले. दिल्ली ही जगातील सर्वात प्रदूषित राजधानी आहे. जगातील १० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी सहा आणि टॉप २० पैकी १३ शहरे भारतात आहेत.

अलिकडच्या अभ्यासानुसार, भारतात दरवर्षी १७ लाख ते २० लाख लोक वायू प्रदूषणामुळे मृत्युमुखी पडतात. स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२५ च्या अहवालात २०२३ मध्ये अंदाजे २० लाख मृत्यूंचा अंदाज आहे आणि २०२२ च्या लॅन्सेट अहवालात १७ लाखांहून अधिक मृत्यूंचा अंदाज आहे. बाहेरील आणि घरातील वायू प्रदूषणामुळे हृदयरोग, स्ट्रोक आणि सीओपीडी सारख्या असंसर्गजन्य आजारांमुळे मृत्यू होतात.

त्याचप्रमाणे, जल प्रदूषण, प्लास्टिक प्रदूषण, मातीचे प्रदूषण आणि अस्वच्छ परिस्थितीमुळे मोठ्या संख्येने अकाली निष्पाप लोकांचा मृत्यू होतो. शिवाय, अनेक आजार शरीर आणि मनावर तसेच जीवनाच्या प्रत्येक पैलूवर गंभीर परिणाम करतात. किरणोत्सर्गी प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, औष्णिक प्रदूषण आणि प्रकाश प्रदूषण आपल्याला मृत्यूच्या तावडीत ढकलतात.

आपल्या देशातील लोक जागरूक होईपर्यंत या व्यवस्था सुधारणार नाहीत. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आपण स्वार्थ आणि लोभ सोडून जीवनाचे मूल्य समजून घेतले पाहिजे. अन्नधान्यांसाठी हानिकारक रसायनांचा वापर बंद करणे आणि सेंद्रिय शेतीचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे.

आपण दररोज आपल्या आजूबाजूला अशा घटना पाहतो ज्या पर्यावरण आणि आरोग्य व्यवस्थांना हानी पोहोचवतात. परंतु बहुतेक लोक अशा समस्या सोडवण्यासाठी आपले कर्तव्य पार पाडण्याचा प्रयत्नही करत नाहीत. गरज, मागणी आणि विकासाच्या नावाखाली, शहरांमधून जमीन झपाट्याने गायब होत असून तिचे सिमेंटमध्ये रूपांतर होत आहे.

झाडं वाढीसाठी पुरेशी माती नसल्याने शहरांमध्ये झाडे कमी होत आहेत. पावसाळ्यात, मंद वा?याने देखील उरलेली झाडे मुळापासून उन्मळून रस्त्यावर पडतात. शहरांमध्ये पावसाचे पाणी शोषून घेण्यासाठी जमीन नाही. तापमान सतत वाढत आहे, ऋतूचक्र विस्कळीत होत आहे, ज्यामुळे पिकांचे सतत नुकसान होते आणि मानवी शरीर कमकुवत होत आहे.

आपण अनेकदा रस्त्यांवर नळाचे पाणी वाहताना पाहतो, दिवसा रस्त्यावर दिवे चालू असतात, लोक निर्भयपणे रस्त्याच्या कडेला कचरा टाकतात, घाण करतात, ते उघड्यावर कचरा जाळतात आणि रस्त्यावर थुंकतात. बंदी घातलेल्या प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो, कारखान्यांमधून निघणारे विषारी रासायनिक पाणी उघड्यावर किंवा शेतात सोडले जाते, नद्यांमध्ये कचरा टाकला जातो,

जैववैद्यकीय कचरा आणि यांत्रिक कचरा योग्यरित्या विल्हेवाट लावली जात नाही, मर्यादित नैसर्गिक संसाधने आणि इंधनाचा अतिरेकी वापर पर्यावरण आणि संपूर्ण जीवसृष्टीला धोका निर्माण करत आहे. कचऱ्याच्या पुनर्वापराच्या व्यवस्थेला योग्यरीत्या वेग मिळत नाही आहे. भेसळ अव्याहतपणे सुरू आहे आणि बहुतेक वस्त्या आणि सार्वजनिक जागा घाणेरड्या राहतात, विशेषतः पावसाळ्यात खूप वाईट परिस्थिती होते. लोकांना त्यांच्या अंगणात झाडांऐवजी अधिक खोल्या हव्या आहेत आणि अतिक्रमणे स्पष्टपणे दिसून येतात.

पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि आपले आरोग्य राखण्यासाठी, आपण शक्य तितके चालणे, सायकल चालवणे किंवा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करून आपला कार्बन फूटप्रिंट कमी करू शकतो. घरे आणि संस्थांमध्ये हरित ऊर्जेचा वापर करा; रिसायकलद्वारे वस्तूंचा पुनर्वापर करा. प्लास्टिकला पर्याय शोधा,

एकदाच वापरता येणारे प्लास्टिक टाळा. अन्न कचरा फेकून देण्याऐवजी, ते कंपोस्ट करा आणि शाश्वत स्त्रोतांपासून बनवलेल्या उत्पादनांचा वापर करा, पर्यावरणपूरक स्वच्छता उत्पादने वापरा, स्वच्छता सहभाग वाढवा आणि अधिक झाडे लावा.

आपल्या अमर्याद इच्छा आणि गरजा पूर्ण करण्यासाठी, मानव पर्यावरणाचे रक्षण करण्याऐवजी त्याचे शोषण करत आहे. मानवांपेक्षा प्राणी, पक्षी, कीटक जीव चांगले आहेत, जे निसर्गाचे रक्षण करण्यात अमूल्य भूमिका बजावतात. आपण आपला आळस आणि स्वार्थ सोडून पर्यावरणाचे रक्षण करण्याची आणि स्वतःच्या सुरक्षिततेची आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. जर हे सुंदर, स्वच्छ आणि अनुकूल वातावरण टिकले तरच आपण पृथ्वीवर आरामात जगू शकू. हे सत्य प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे.

निसर्ग आपल्याला नेहमीच निःस्वार्थपणे देतो, त्याचप्रमाणे त्याची काळजी घेणे देखील आवश्यक आहे. पैशाने आपण श्वास विकत घेऊ शकत नाहीत; सर्व जीवांना जीवनाची आवश्यक संसाधने निसर्ग स्वतः पुरवतो. मानवांनी पर्यावरणाशी छेडछाड करण्यापासून दूर राहावे, नाहीतर निसर्ग आपला विनाशकारी प्रकोप प्रकट करेल. प्रत्येक मानव, प्राणी आणि सजीवांना निसर्गाद्वारे सहज उपलब्ध असलेल्या गोष्टींवर समान अधिकार आहेत, जसे की शुद्ध हवा, पाणी, सूर्यप्रकाश, पौष्टिक अन्न, झाडे, वनस्पती आणि हिरवळ. हे प्रदुषित करायचे नाही, तर त्यांचे संरक्षण करायचे आहे.

■ ■ ■

## झेंडे धरण्याऐवजी प्रश्न विचारा

वाचक लिहितात

सद्धया राज्यात नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीची धूम सुरू आहे. विविध राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनी प्रचार सुरू केला आहे. प्रचार रॅलीत हजारो युवक उमेदवारांचे झेंडे धरून दिसतात, घरोघरी पॉम्प्लेट वाटप करतात, सायंकाळी ओल्या पाट्यांमध्ये मजा करतात. यात शिक्षीत तरूणांचाही भरणा आहे.

तथापि, अशा राजकारण्यांच्या नादी लागण्यापेक्षा तरूणांनी आपल्या करिअरकडे लक्ष पुरविणे गरजेचे आहे. निवडणुकीत उभे असलेल्यांना प्रश्न विचारा की आजवर विकासाची किती कामे केलीत आणि भविष्यात काय काय करणार? जो खरेच लोकांची कामे करतो, वेळप्रसंगी धावून येतो, प्रामाणिक आहे, त्याच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहायला हवे. छुटभैय्या नेत्यांच्या मागे लागून आपले भविष्य तरूणांनी खराब करू नये, कोर्टाच्या चकरा मारू नये.

■ सुधाकर शिंदे, नागपूर.

## अंडी, चिकन वा पनीर, कोणात आहे जास्त प्रोटीन?



प्रोटीन आपल्या शरीराच्या विकासासाठी सर्वात महत्वाच्या तत्वांपैकी एक आहे. प्रोटीन शारीरिक विकासासोबत मसल्स वाढवणे आणि रिकव्हरी करण्यासाठी आवश्यक आहे. अशात प्रोटीनची गरज पूर्ण करण्यासाठी लोक चिकन, अंडी आणि पनीरचे सेवन करतात. परंतू अनेक लोक कन्फ्युज असतात की प्रोटीनसाठी काय खाणे योग्य ठरेल.

**चिकन** : चिकनचा विचार करताना प्रोटीनसाठी चिकन ब्रेस्टला उत्तम मानले जाते. १०० ग्रॅम चिकन ब्रेस्टमध्ये सुमारे १६५ कॅलरी असते. आणि ३१-३२ ग्रॅम प्रोटीन असते. याशिवाय ३.५ ग्रॅम फॅट असते. यात कार्ब्स अजिबात नसते.

**पनीर** : समजा १०० ग्रॅम पनीर घेतले तर यात २६५ ते ३०० कॅलरी असते. आणि प्रोटीनचा विचार केला तर यात १८ ग्रॅम प्रोटीन असते. तर २०-२१ ग्रॅम फॅट आणि १-२ ग्रॅम कार्ब्स असते. पनीरमध्ये हळू पचणारे प्रोटीन असते. जे हळूहळू शरीरात रिलीज होतो. त्यामुळे बराच काळ पोट भरलेले वाटते. त्यामुळे पनीर खाल्ल्यानंतर बराच वेळ भूक लागत नाही आणि वजन कमी करण्यास मदत देखील मिळते.एवढेच नाही तर पनीरमध्ये हेल्दी फॅट्स आणि कॅल्शियम देखील असते. जे मसल्स आणि हाडांना रिकव्हरीत मदत करते.

**अंडी** : जिममध्ये जाणारे बहुतांशी लोक प्रोटीनसाठी अंड्यांना प्राधान्य देतात.

त्याचे सर्वात मोठे कारण अंड्यात हाय क्वॉलीटीचे प्रोटीन असते. तज्ज्ञ लोक याला गोल्ड स्टँडर्ड प्रोटीन म्हणतात. पोषक तत्वांचा विचार करता २ मोठ्या अंड्यात ( जी सुमारे १०० ग्रॅमची असतील ) सुमारे १५५ कॅलरी असते. यात १३ ग्रॅम प्रोटीन आणि १.१ ग्रॅम कार्ब्स असतात. अंड्यातील हाय क्वॉलीटी प्रोटीनला शरीर चांगल्या प्रकारे शोषून घेते.

अंड्यात हाय क्वॉलिटी प्रोटीन शिवाय विटामिन डी आणि विटामिन बी- १२ असते.

तिघांपैकी कोणता पर्याय चांगला ?

जर तुम्ही शाकाहारी आहात तर तुमच्यासाठी पनीर चांगला पर्याय असू शकतो.

अंड्यांचा विचार करता लहान मुलांपासून जिम जाणारे आणि बुजुर्ग लोक अशा प्रत्येकासाठी अंडी प्रोटीनचा सर्वात चांगला सोर्स आहे. जर तुम्ही मांसाहारी असाल तर चिकन तुमच्यासाठी बेस्ट आहे. कारण यात प्रोटीन अधिक असते.

अनेक रिपोर्टनुसार बॅलन्स न्युट्रीशन हवे असेल तर चिकन आणि पनीर हाय प्रोटीनचा सोर्स आहे. अंड्याचे प्रोटीन हाय क्वॉलिटीचे असते. त्याचे शरीरात शोषण चांगले होते. जर तुम्हाला मसल्स वाढवायचे असतील आणि रिकव्हरी करायची असेल तर अंड्यांची निवड करा. प्रोटीनसाठी कोणतीही एक पदार्थ बेस्ट असू शकत नाही. हा तुमचा डाएट प्लान आणि एकूणच तुमच्या लाईफस्टाईलवर अवलंबून आहे.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### उमेदवाराचे मनोगत!

मतदारांनो तुम्हीच
आहात आमचे मायबाप
एकदा चानस तर द्या
मग पहा माझा परताप..

लाल दिव्याच्या गाडीचे
मला लागले डोहाळे
तुम्हाला हवं ते देतो
पण निवडून द्या मले..

एकदा का निवडून आलो
तर रेकॉर्ड सारे मोडीन
दहा पिढ्याले पुरेल एवढी
माया जमा करीन...

# राज्यात एकाचवेळी सर्व शाळांतील विद्यार्थ्यांची उपस्थिती पडताळणी

## अनियमितता आढळल्यास शिस्तभंगाची कारवाई



महासागर | प्रतिनिधी

***अमरावती,( दि.25 )- सन 2025-26 या शैक्षणिक वर्षापासून 'संच मान्यता' आता यु-डायस प्लस प्रणालीमध्ये मुख्याध्यापकांनी भरलेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीनुसार दिली जाणार आहे. युडायस प्लसवर प्रत्येक विद्यार्थ्यांची नोंद मुख्याध्यापक लॉगिनमधून केली जाते आणि हिच माहिती पुढील संच मान्यतेसाठी आधारभूत धरली जाणार असल्याने तिच्या शाब्दिक व तथ्यात्मक पडताळणीची जबाबदारी केंद्रप्रमुख आणि गटशिक्षणाधिकारी यांच्यावर सोपवण्यात आली आहे.***

शिक्षण संचालनालयाने जारी केलेल्या पत्रानुसार, राज्यभर एकाच दिवशी सर्व शाळांची उपस्थिती पडताळणी होणार असून यासाठी विशेष पथकही नियुक्त केले जाणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केंद्रप्रमुखांनी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांच्या दैनिक उपस्थितीची, भेटीच्या दिवशी असलेल्या हजर विद्यार्थ्यांची तसेच परीक्षा दिनांकावरील उपस्थितीची तपासणी करणे आवश्यक आहे. यापूर्वी घेतलेल्या भेटींचा उपस्थिती अहवालही तपासण्यात येणार आहे. सतत गैरहजर, बनावट किंवा केवळ शिक्षक व शिक्षकेतर पदे वाढवण्यासाठी मनमानी पद्धतीने नोंदवलेले विद्यार्थी संच मान्यतेसाठी फॉरवर्ड करता कामा नयेत, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. या प्रक्रियेत अनियमितता आढळल्यास जबाबदारी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी (बीट) व गटशिक्षणाधिकारी यांच्यावर निश्चित केली जाणार आहे.

## पडताळणी 15 डिसेंबर पुर्वी करणे आवश्यक

गटशिक्षणाधिकाऱ्यांनी फेरतपासणीसाठी पाठवलेल्या विद्यार्थ्यांची पुन्हा एकदा पडताळणी करून फक्त योग्य माहितीच अंतिम करावी. चुकीची नोंद झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या कमी करण्याचे निर्देश आहेत. ही संपूर्ण पडताळणी 15 डिसेंबर 2025 पूर्वी पूर्ण करणे बंधनकारक आहे. राज्यस्तरीय विशेष पथकाद्वारे उपस्थितीची एकाचवेळी तपासणी केली जाईल. कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधित सर्व जबाबदारांवर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित होणार आहे.



शाळेत प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवरून पटपडताळणी होत असेल तर स्वागतार्ह आहे. उपस्थित विद्यार्थी संच मान्यतेसाठी ग्राह्य धरणे आवश्यक आहे. आधारकार्डातील त्रुटींवरून विद्यार्थ्यांला वगळणे चुकीचे ठरेल. शाळांचे अस्तित्व टिकवण्यासाठी पुरेसे शिक्षक असणे गरजेचे असून 15 मार्च 2024 चा शासन निर्णय रद्द होणेही आवश्यक आहे.

**विजय कोंबे,**
**राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती.**

## बनावट नोटा प्रकरणात तिघांना अटक

**धारणी** - मध्य प्रदेशातील भोपाळ येथील गोकुलधाम सोसायटीमध्ये चालणाऱ्या बनावट नोटांच्या कारखान्यावर छापा टाकत पोलिसांनी खंडवा येथील मुख्य सूत्रधारासह तीन फरार आरोपींना केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी एक हा जिल्हा परिषद शाळेतील प्रभारी मुख्याध्यापक असून, त्याचा मूळ संबंध अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्याशी असल्याचे निष्पन्न झाले आहे. खंडवा पोलिस अधीक्षक मनोज कुमार राय यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) रविवारी (23 नोव्हेंबर) ही कारवाई केली. या पार्श्वभूमीवर बनावट नोटांचे नेटवर्क राज्यातील अनेक भागांत पसरले असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुख्य सूत्रधार डॉ. प्रतीक सुरेश नवलाखे (ब-हाणपूर), गोपाल ऊर्फ राहुल मांगीलाल पनवार (35, हरदा), प्रभारी मुख्याध्यापक दिनेश दीपक गोरे (43, रा. साईनगर, धारणी) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

# मुख्यमंत्र्यांकडून 52 कोटींच्या जलयोजनेची घोषणा



## चिखलदरा-धारणी तालुक्याला होणार लाभ

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी,( दि.25 )** - धारणी नगरपंचायत निवडणुकीच्या तोंडावर मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रचार सभा रंग भवन मैदानात पार पडली. यावेळी फडणवीस यांनी अमृत मिशनअंतर्गत धारणीसाठी 52 कोटी आणि चिखलदरासाठी 54 कोटींच्या पाणीपुरवठा योजनेला मंजुरी जाहीर केली. दोनही तालुक्यांतील पाणीटंचाई सोडवण्यासाठी जलवितरण यंत्रणा सक्षम केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मंचावर अनिल बोंडे, नवनीत राणा, प्रभुदास भिलावेकर, आमदार प्रवीण पोटे, केवळराम काळे, राजेश वानखेडे, रविराज देशमुख यांसह भाजपचे सर्व प्रमुख नेते उपस्थित होते. भाषणात नवनीत राणांनी मेळघाटातील राजकारणावर प्रहार केला. फडणवीस यांनी व्यापारी संकुल, क्रिकेट स्टेडियम आणि इतर विकासकामे लवकरच सुरू करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. सभेस मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# निवडणुकीत काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि. 25 )** - लोकसभा आणि विधानसभा सार्वत्रिक तसेच पोटनिवडणुकांदरम्यान कर्तव्य बजावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मानधन, पारिश्रमिक आणि भत्त्यांमध्ये महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने मोठी वाढ केली आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार जारी केलेला हा निर्णय 24 नोव्हेंबर 2025 पासून तात्काळ लागू करण्यात आला आहे. मतदान केंद्राध्यक्ष व पर्यवेक्षक यांचे दैनिक मानधन 350 रुपयांवरून 500 रुपये केले असून, एकत्रित रक्कम 2 हजार रुपये असेल. मतदान अधिकाऱ्यांना पूर्वीच्या 250 ऐवजी 400 रुपये (एकत्रित 1,600 रुपये) मिळणार आहेत. मतमोजणी सहाय्यकांचा भत्ता 250 वरून 450 रुपये (एकत्रित 1,350 रुपये) करण्यात आला आहे. ईव्हीएम कमिशनिंग व साहित्य वाटपातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे मानधन 200 वरून 350 रुपये (एकत्रित 1,400 रुपये) करण्यात आले. निवडणुकीत नियुक्त अधिकारी-कर्मचारी, पोलीस, होमगार्ड, एनसीसी कॅडेट्स, माजी सैनिक व स्वयंसेवक यांचा रोजचा भत्ता 150 रुपयांवरून थेट 500 रुपये करण्यात आला आहे. लेखा पथक, फिरते व्हिडिओ पथक व नियंत्रण कक्ष कर्मचाऱ्यांच्या भत्त्यांमध्येही मोठी वाढ करून वर्ग-1 आणि 2 अधिकाऱ्यांसाठी 3 हजार रुपये तर वर्ग-3 कर्मचाऱ्यांसाठी 2 हजार रुपये निर्धारित करण्यात आले आहेत. सूक्ष्म निरीक्षकांचे मानधन 1 हजारांवरून 2 हजार रुपये करण्यात आले आहे. या निर्णयामुळे निवडणूक प्रक्रियेत कार्यरत कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## पुंडलिकराव मानकर यांचे निधन



**अमरावती** - शिरजगाव ( मोझरी ) ता. तिवसा येथील माजी ग्रामपंचायत सदस्य पुंडलिकराव गोपाळराव मानकर यांचे आज दिनांक 25 नोव्हेंबर रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते 98 वर्षाचे होते. त्यांची अंत्ययात्रा आज दुपारी 01 वाजता शिरजगाव मोझरी येथील त्यांच्या राहते घरुन निघेल. त्यांच्या पश्चात दोन मुले, सहा मुली, जावई, नातू, पणतू असा आप्त परिवार आहे. आरटीओ संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अनिल मानकर यांचे ते मोठे वडील होते.

# विद्यानिकेतनच्या विद्यार्थ्यांचे अविष्कार स्पर्धेमध्ये सुयश

महासागर | प्रतिनिधी




**अंजनगाव सुर्जी,( दि.25 )**- डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, रायगड द्वारा आयोजित विद्यार्थ्यांमधील संशोधन प्रवृत्तीला महत्व देऊन त्यांच्या नव कल्पना जाणून घेऊन त्यांचे सादरीकरण करण्याची संधी देणारी स्पर्धा अविष्काराया वर्षी गोविंदराव वंजारी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय नागपूर, येथे विभागीय स्तरावर आयोजित करण्यात आली होती. ज्यामध्ये, शेती आणि पशुसंवर्धन, वाणिज्य व्यवस्थापन कायदा, शुद्ध विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान ,औषध आणि औषधनिर्माण ,मानविकी भाषा ललित कला अशा विवध स्तरांत सादरीकरण करण्याची मुभा विद्यार्थ्यांना देण्यात आली होती. .

या स्पर्धेमध्ये विद्यानिकेतन फार्मसी महाविद्यालयाचे एकून 10 विद्यार्थी आपल्या नवोदित कल्पना घेऊन स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. अविष्कार स्पर्धेकरिता महाविद्यालयातर्फे अविष्कार स्पर्धा समन्वयक म्हणून प्रा. दाभाडे , प्रा. डोईफोडे व प्रा. अब्दुल अहेसान सहभागी झाले होते. त्यापैकी प्रा. अब्दुल अहेसान अब्दुल फारुख यांच्या मार्गदर्शनात असलेले विद्यार्थी मो. कैफ व गौरी अंबाडकर यांनी अनुक्रमे शेती आणि पशुसंवर्धन व औषध आणि औषधनिर्माण या विषयांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. सर्व सहभागी विद्यार्थी तसेच त्यांचे मार्गदर्शक प्राध्यापक यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मेहेत्रे यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष आमदार . ज. मो. अभ्यंकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून प्रत्येक विद्यार्थ्यातील संशोधन प्रवृत्तीला चालना देण्याचे आवाहन केले, तसेच संस्थेच्या उपाध्यक्षा मा. निर्मला अभ्यंकर तथा सचिव . प्रशांत अभ्यंकर व इतर संचालक यांच्या वतीने विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

# संविधान दिन जनजागृती अभियानाचे उद्घाटन

**अमरावती ( दि.25 )** - संविधान दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त समाज कल्याण विभागातर्फे 'घर घर संविधान' उपक्रमाला प्रारंभ होत आहे. यानुसार 26 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 वाजता श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या महर्षी रमण सभागृहात संविधान दिन जनजागृती अभियानाचे उद्घाटन होणार असून, संविधान प्रास्ताविकेचे सामुदायिक वाचन व संविधान चित्ररथाचा शुभारंभ करण्यात येईल. या उपक्रमात शासकीय निवासी शाळा, वसतिगृहे, अनुदानित-विनाअनुदानित संस्था आणि दिव्यांग केंद्रांमार्फत संविधान परिचयाचे विविध कार्यक्रम राबविले जातील. शाळा-महाविद्यालयांच्या दर्शनी भागात उद्देशिका लावणे, प्रार्थनेत दररोज प्रास्ताविका वाचन, वाचनालयात संविधानाच्या प्रती उपलब्ध करणे, तसेच व्याख्याने, पथनाट्य, पोस्टर प्रदर्शन, निबंध, भाषण व चित्रकला स्पर्धांचा समावेश आहे. 26 नोव्हेंबर 2025 ते 26 जानेवारी 2026 दरम्यान संविधान मूल्यांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम आणि संविधान संमेलन आयोजित केले जाणार असून, नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्रादेशिक उपायुक्त माया केदार व सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले आहे.

# विद्यार्थी जीवनातील शाळा म्हणजे ज्ञानाचा स्वर्ग - सरपंच विजया चवाळे



महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे,( दि.25 )** - तालुक्यातील बग्गी येथील संत मनीराम महाराज विद्यालयात पं. जवाहरलाल नेहरू जयंती व बालदिनानिमित्त 'बाल आनंद उत्सव'मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. परिसरातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी आणि शिक्षकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. रंगकाम, मातीकाम, कागदकाम, नक्षीकाम अशा कौशल्याधारित उपक्रमांनी मेळावा रंगला. सोनगाव मूकबधिर शाळेने विशेष कामगिरी करून क्रमांक पटकावला. कार्यक्रमात सरपंच विजया चवाळे म्हणाल्या, विद्यार्थी जीवन म्हणजे ज्ञानाचा खरा स्वर्ग. संत मनीराम विद्यालय हे विद्यार्थी घडवणारे केंद्र आहे. शाळेची पटसंख्या टिकावी यासाठी ग्रामस्थांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद झाडे होते. उद्घाटन अशोक देशमुख यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे प्रसाद संकपाळ, भाग्यवंत, रोशन बोडके, पंडित पंडागळे, संजीव खाडे आदी मान्यवर उपस्थित होते. गायन मार्गदर्शन राजेश उमाळे यांनी केले. प्रास्ताविक पवार यांनी तर आभार प्रदर्शन सोळंके यांनी केले.

# वरुडमध्ये 'हरित' संकट, तरुण पिढी गांजाच्या विळख्यात

## पालक व प्रशासन चिंतेत

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि. 25 )** - वरुड तालुक्यात अलीकडच्या काही महिन्यांमध्ये गांजाचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याने समाजातील सुजाण नागरिक, पालक, शाळा व्यवस्थापन आणि पोलीस यंत्रणे समोर आव्हान निर्माण झाले आहे. विशेषत: 16 ते 25 वयोगटातील तरुण पिढी मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या विळख्यात अडकताना दिसत आहे, ही गोष्ट समाजासाठी धोक्याची घंटा ठरत आहे. वरुड शहरासह आसपासच्या



काही ग्रामीण भागांमध्ये गुप्तरित्या गांजा पुरवठा करणारी लहान-मोठी टोळ्या सक्रिय झाल्याचे संकेत मिळत आहेत. शाळा-कॉलेजच्या आसपास अपरिचित तरुणांची ये-जा वाढली असून, कमी किमतीत सहज उपलब्धता हा तरुणांना आकर्षित करणारा मोठा घटक ठरत आहे. वरुड पोलीस ठाण्याने काही ठिकाणी धाडी टाकून कांजा विक्री करणाऱ्यांवर कार्यवाही केली पाहिजे, मुख्य पुरवठादारांपर्यंत पोहोचण्यासाठी आव्हाने असले तरी त्यावर मात करून त्यांच्यापर्यंत पोहोचून त्यांना जेल बंद करणे हाच यावर एकमेव उपाय आहे तर गुप्त माहितीच्या आधारावर त्यांना पकडणे सोपे जाईल असेही बोलल्या जात आहे.

### समाजाने एकत्र येण्याची गरज

समाजातील ज्येष्ठ नागरिक, सामाजिक संघटना आणि स्थानिक नेत्यांनी व्यसनमुक्ती मोहिमेला जोर देण्याची मागणी केली पाहिजे. तज्ज्ञांच्या मते, गांजाचे व्यसन सुरुवातीला हलके वाटले तरी पुढे मानसिक, सामाजिक आणि शारीरिक पातळीवर धोकादायक परिणाम करतं तरुण पिढी हीच समाजाची उभारणी; पण वरुड तालुक्यात वाढत असलेले गांजाचे प्रमाण भविष्यासाठी धोक्याची घंटा ठरत आहे. प्रशासन, पालक, शिक्षक आणि समाज यांनी एकत्र येऊन तातडीने पावले उचलली नाहीत, तर हे 'हरित संकट' मोठ्या आपत्तीत रूपांतरित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### पालकांत चिंतेचे वातावरण

गांजामुळे तरुणांच्या वर्तणुकीत बदल, अभ्यासात अनास्था, आक्रमकता आणि मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम दिसू लागल्याने पालक त्रस्त आणि अस्वस्थ झाले आहेत. अनेकांनी शाळा व्यवस्थापनाशी संवाद साधत कडक पावले उचलण्याची मागणी केली आहे. काही शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांमधील वाढती व्यसनाधीनता ओळखून व्यसनमुक्ती जनजागृती तज्ज्ञांचे मार्गदर्शन समुपदेशन शिबिरे यासारख्या उपक्रमांना सुरुवात करायला हवी. शिक्षकांच्या मते, व्यसनापेक्षा कुतूहल आणि साथीदारांचा दबाव ही तरुणांना यामध्ये ओढणारी मुख्य कारणे आहेत.

# आष्टी ते टाकरखेडा संभू रस्ता झाला जीवघेणा

## पाच किमीच्या मार्गावर खड्डयांचे साम्राज्य; किरकोळ अपघातांत वाढ



महासागर | प्रतिनिधी

**टाकरखेडा संभू ( दि. 25 )** - टाकरखेडा संभू ते आष्टी हा अवघा पाच किलोमीटरचा मार्ग नागरिकांसाठी आता मृत्यूचा सापळा ठरत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याचे कायमस्वरूपी काम झाले नसून, केवळ वरवरच्या डांबरीकरणाने प्रशासनाने थातुरमातुर उपाय केल्याचे चित्र दिसते.

सध्या या मार्गावर तीन ते चार फूट खोल आणि रुंद खड्डे पडले असून, पावसामुळे त्यात पाणी साचल्याने दुचाकीस्वारांना त्यांचा अंदाज येत नाही. परिणामी दररोज किरकोळ अपघातांच्या घटना घडत असून, नागरिकांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. दररोज शेकडो नागरिक या मार्गावरून प्रवास करतात. मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष आणि ठेकेदाराची निष्काळजी वृत्ती यामुळे ग्रामस्थांत प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. ग्रामपंचायतचे उपसरपंच प्रदीप शेंडे यांनी या रस्त्याच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी यापूर्वी 26 जानेवारीला उपोषण केले होते, तसेच अनेक वेळा निवेदनाद्वारे प्रश्न उपस्थित केला होता. तरीही अद्याप ठोस उपाययोजना झालेली नाही. नागरिकांचा सवाल आहे की, प्रशासन नेमके काय वाट बघत आहे? एखादा बळी गेल्यावरच का रस्ता दुरुस्त होणार?

रस्ता दुरुस्ती करिता मी ग्रामपंचायत समोर उपोषण देखील केले होते यावरून रस्ता दुरुस्तीच्या आश्वासन देण्यात आले परंतु अद्यापही कोणत्याच प्रकारचे अंमलबजावणी झाली नाही

**प्रदीप शेंडे, उपसरपंच**

अमरावती रोज येने जाने चालू राहते रस्ता ईतका खराब झाला अक्षरशा 1 फुटांचे लांबी रुंदी खडे पडले आहे मला स्वत:ला कमरेचा त्रास होत आहे माझ्या सारखे 20 पेशंट झाले आहे लहान मुलांना पन त्रास होत आहे या वयात मुलांना अपंगत्व येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**रितेश विंचुरकर, नागरिक**

सेतूच्या कामानिम्मित भातकुली ये -जा असते परंतु ये जा करताना आष्टी- टाकरखेडा रोडच्या वाईट परिस्थितीमुळे अवघ्या तिशीच्या वयात कंबरदुखी सारख्या त्रासाला सुरवात झाली रस्ता दुरुस्ती च्या नावाने नुसते ठिगल लावली जात आहे पण नवीन रस्ता बांधकाम किती वर्ष लोटून गेले तरी होत नाही शासन कदाचित एखादा बळी घेतल्यावर रस्ता करेल असे वाटते आहे

**देवेंद्र जाधव, टाकरखेडा संभू**

आष्टी रस्ता दुरुस्तीसाठी आम्ही तिवसा मतदार संघाचे आमदार राजेश वानखडे साहेब हे दुर्गादेवीची ला भेट देण्याकरिता आले होते तेव्हा आम्ही त्यांना विचारपूस केली होती की हा रस्ता केव्हा होणार ते म्हणत होते होईल पण आतापर्यंत त्या रस्त्याचं काहीच झालेलं नाही

**अतिश देशमुख, टाकरखेडा संभु**

आम्ही अपडाऊन करणारे या सर्व सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तरीही त्या रस्त्याला अर्धवट डांबरीकरण करून रस्त्याचे नुकसान होत आहे आणि ते रस्त्याचे डांबरीकरण डबल उखळून रस्ता बेकार होत आहे.आणि आष्टी रस्त्याने अपघात होत आहेत. सर्व सामान्य लोकांच्या मोटर सायकल, व कार. या वाहतूक करणारे मोठ्या गाड्या या लोकांना त्रास सहन करा लागते.

**पुनित काळे, टाकरखेडा संभु**

# क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांची 150 वी जयंती उत्साहात साजरी

महासागर | प्रतिनिधी



**चांदूर रेल्वे( दि.25 )** - आदिवासी समाजाचे जनक आणि स्वातंर्त्यलढ्यातील प्रेरणास्थान असलेल्या क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त चांदूर रेल्वे येथे भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. गोंड वंश बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित हा सोहळा उत्साहात आणि शिस्तबद्धपणे पार पडला. पदयात्रेला गोंडपुरा शिवाजीनगर येथून सुरुवात झाली. बसस्थानक ङ्क विरूळ चौक ङ्क जुना मोटर स्टँड या प्रमुख मार्गाने फिरत पदयात्रेचा समारोप गोंडवाना भूमी येथे करण्यात आला. पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या आदिवासी बांधवांनी सांस्कृतिक नृत्याचे मोहक सादरीकरण करून कार्यक्रमाला अनोखी रंगत आणली. पिढ्यान् पिढ्या जपलेली सांस्कृतिक परंपरा या पदयात्रेद्वारे अभिमानाने प्रदर्शित करण्यात आली.

सुपलवाडा, मोहाडी, सावंगा बु., मांजरखेळ, चिरोडी, धानोरा म्हाली, थूगाव, चांदूरवाडी, मांडवा, शिरजगाव अशा विविध गावांमधून आदिवासी समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून जयंती महोत्सवात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गोंडवंश बहुउद्देशीय संस्थेचे सदस्य व पदाधिकारी विजय कुमरे, मनोहर पंधराम, करण सयामे, सचिन सयामे, अनिकेत धुर्वे, दिनेश सयामे, संतोष कुमरे, विकी मडावी, दिगांबर उईके, पवन कुमरे, श्याम दुर्वे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. पडली.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# देशाच्या एकात्मतेचे आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणारा दिवस

राजेशाहीच्या काळात राजाला जे योग्य वाटेल तो निर्णय घेण्याचा अधिकार त्याच्याकडे असायचा. प्रजेचे म्हणणे विचारत घेण्याचे त्यांच्यावर बंधन नव्हते. यातील बहुतांश निर्णय राजा त्याच्या हिताचेच घ्यायचा. याचे कारण राजाला जनता निवडून देत नव्हती. तो वंशपरंपरेने राजा होत होता. पण आता ती परिस्थीती राहिला नाही. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशाने सर्व प्रकारची राजेशाही, सरंमजाशाही व्यवस्था नाकारून संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आहे. आणि ही संसदीय लोकशाही भारतीय संविधानावर आधारित आहे. यातून अप्रत्यक्षपणे जनताच म्हणजे आपणच देशाचा संपुर्ण कारभार करत असतो. म्हणजे जनता हीच देशाची सर्वाधिकारी असते.

२६ नोव्हेंबरला संविधान दिवस आपण साजरा करत आहोत परंतू ,केव्हापासुन हा साजरा केला जातो या दिवसाबददलचे महत्व आणि उददेश याबददल अधिक सोप्या व साध्या भाषेत समजुन घेवुया...

आम्ही, भारताचे लोक म्हणजे काय? आम्ही, भारताचे लोक हे भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेचे सुरुवातीचे वाक्य आहे. हे भारतातील नागरिकांची सामूहिक ओळख आणि राष्ट्राचे भवितव्य घडवण्यात अधिकार आणि शक्तीचा अंतिम स्रोत म्हणून त्यांची भूमिका दर्शवते.

देश नीट चालायचा असेल तर त्या देशाचं संविधान योग्य प्रकारे प्रत्येक नागरिकाला माहीत असणं आवश्यक आहे, त्यामुळे संविधान साक्षर होणं आवश्यक आहे. संविधान काय आहे, हे लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांनी समजून घेतलं पाहिजे.


संविधान हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे. हा एक लिखित दस्तऐवज आहे जो मूलभूत मूलभूत कोड, रचना, कार्यपद्धती, अधिकार आणि सरकार आणि त्याच्या संस्थांची कर्तव्ये आणि नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये यांचे सीमांकन करणारा फ्रेमवर्क देतो.

२०१५ मध्ये भारत सरकारने २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला होता. २०१५ हे वर्ष यासाठी विशेष ठरले कारण त्या वर्षी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. भीमराव आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करण्यात आली. तेव्हापासून, संविधानिक मूल्यांबद्दल नागरिकांमध्ये आदराची भावना वाढवण्यासाठी हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो.

आपल्या भारत देशात २६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाच्या संविधान सभेने सध्याची राज्यघटना स्वीकारली. त्यामुळे या दिवसाच्या स्मरणार्थ दरवर्षी देशात सर्वत्र 'संविधान दिन' साजरा केला जातो.

भारतातील विविध धर्म आणि जातींच्या १४० कोटी लोकसंख्येला एक देश म्हणून एकत्रित करणारी ही राज्यघटना आहे.आपल्या देशाचे सर्व कायदे या राज्यघटनेने बनवलेले आहेत.

या संविधानांतर्गत सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, संसद, राज्य विधिमंडळ, पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यासह देशातील सर्व न्यायालये त्याअंतर्गत काम करतात. शिवाय, याच संविधानाने आपल्या अनेक




हक्क दिले आहेत , ज्यामुळे आपण संपूर्ण स्वातंत्र्य आणि समानतेने जीवन जगतो.

देशातील नागरिकांमध्ये घटनात्मक मूल्यांबद्दल आदराची भावना वाढवणे हा संविधान दिनाचा मूळ उद्देश आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा आपल्याकडे स्वतःचे कोणतेही संविधान नव्हते. संविधानाशिवाय देश चालवता येत नाही, म्हणून संविधान सभेची स्थापना करण्यात आली.

पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, श्यामा प्रसाद मुखर्जी, मौलाना अबुल कलाम आझाद हे नेते या बैठकीचे प्रमुख सदस्य होते. तर, डॉ. भीमराव आंबेडकर हे राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते, म्हणून त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असेही म्हटले जाते.

संविधान तयार करण्यासाठी २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस लागले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी पूर्ण होऊन त्याचा स्वीकार करण्यात आला. यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना लागू करण्यात आली.



ॲड. दत्तात्रय दिनकर फडतरे
पुणे. 7588072685

संविधान दिवस हा प्रत्येक भारतीय नागरिकासाठी अभिमानाचा दिवस आहे. कोणताही देश संविधानाशिवाय चालू शकत नाही. राज्यघटनेतच देशाची तत्त्वे आणि ती चालवण्याच्या पद्धती आहेत.

संविधानामुळेच आपण स्वतंत्र देशाचे स्वतंत्र नागरिक आहोत. राज्यघटनेने दिलेले मुलभूत अधिकार हे आपली ढाल म्हणून काम करून आपल्याला हक्क बहाल करत असले. तर, त्यात दिलेली मुलभूत कर्तव्ये आपल्याला आपल्या जबाबदाऱ्यांची आठवण देण्यासाठी

शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालयांमध्ये अनेक प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

शाळा, महाविद्यालयांमध्ये भाषण, निबंध लेखन आणि प्रश्नमंजुषा स्पर्धा घेतल्या जातात. येथे शाळेतील विद्यार्थी- विद्यार्थीनीं 'संविधान दिनानिमित्त भाषण करतात.संविधानिक मूल्यांबद्दल नागरिकांमध्ये आदराची भावना वाढवण्यासाठी हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो.

भारतीय संविधान हे जगातील सर्वात लांब लिखित संविधान आहे. त्याचे बरेच भाग युनायटेड किंगडम, अमेरिका, जर्मनी, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि जपानच्या संविधानांमधून घेतले गेले आहेत. यामध्ये देशातील नागरिकांचे मूलभूत अधिकार, कर्तव्ये, सरकारची भूमिका, पंतप्रधान, राष्ट्रपती, राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांचे अधिकार यांचे वर्णन केले आहे. विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका यांचे काम काय आहे, देश चालवताना त्यांची भूमिका काय असावी, अशा या सर्व गोष्टी राज्यघटनेत नमूद केल्या आहेत.

जगात भारतास अग्रणी बनविण्याचे लक्ष्य आम्ही सर्व १४० कोटी भारतीयांना एका दिशेने मार्गक्रमण करण्यास प्रेरित करणारे आहे. आमच्या घटनाकर्त्यांनी आम्हाला ह्यआम्ही भारताचे लोकह्ल असे संबोधित केले, तेव्हा याचा संबंध केवळ लोकसंख्येपुरताच मर्यादित नक्कीच नव्हता. त्यांच्या दृष्टीने एकात्म, समरस, समान ध्येय असणारा, विषमता नसणारा आणि सर्वांना समान संधी असलेला समाज अपेक्षित असणार, यात शंका नाही.

गरिबी निर्मूलन करून आर्थिक समृद्धी आणणे आणि त्यासोबतच समान लक्ष्य असणारा भारतीय समाज निर्माण करणे, हे आमचे लक्ष्य असायला हवे. देशातील आजच्या अग्रणी देशांनी आपल्या समाजामध्ये या गुणांची वृद्धी करूनच अग्रणी होण्याचे लक्ष्य साध्य केले आहे.

आजच्या या संविधानदिनाचे औचित्य साधून महापुरूषांच्या इच्छा पूर्ण करण्याचा संकल्प केला, तरच आम्ही भारताचे लोकह्ल असे संबोधण्याचा अधिकार आपल्याला प्राप्त होईल.

आज ७५+ वर्षांनंतरही भारतीय संविधान जगातील सर्वात यशस्वी लिखित संविधान मानले जाते, पण दुर्दैवाने संविधानाची खरी ओळख, त्यातील अधिकार-कर्तव्ये आणि मूल्ये याबाबत सामान्य नागरिकांमध्ये प्रचंड अज्ञान आहे. म्हणूनच संविधान दिवस हा केवळ औपचारिक सोहळा न राहता खऱ्या जागरुकतेचा दिवस बनला पाहिजे.

न्यायव्यवस्थेत अनेक कमतरता असल्या तरीही भारतीय न्यायमंडळ संविधानाचा खरा उद्देश मोठ्या प्रमाणात पूर्ण करत आहे. पण समाजाने अपेक्षित असलेला जलद, सुलभ, स्वस्त, सर्वांसाठी समान न्याय मिळवण्यासाठी अजून सुधारणा आवश्यक आहेत.

या संविधान दिनी आपण आपली मूलभूत कर्तव्ये आणि देशाचे कायदे आयुष्यभर पाळण्याची शपथ घेतली पाहिजे. देशाचा एक चांगला आणि जबाबदार नागरिक बनल्याने संविधानाचा उद्देश तर पूर्ण होईलच शिवाय, संविधान निर्मात्यांच्या स्वप्नातील राष्ट्रही घडेल. आज देशातील काही वर्गाचं जीवनमान गरीब आफ्रिकन देशांपेक्षा वाईट आहे. त्यांना अन्न, वस्त्र, शिक्षण, आरोग्य या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत.त्यांना शोषणाचे बळी व्हावे लागते.

मित्रांनो, आज आपण अशा लोकांना आर्थिक आणि सामाजिक न्याय मिळवून देण्याची शपथ घेतली पाहिजे.आर्थिक विषमतेची खोल दरी कमी करूनच संविधानदिनाचे उद्दिष्ट पूर्ण होईल.

■ ■ ■

# भारतीय संविधान : समतेचा पाया आणि बाबासाहेबांचा दृष्टीकोन!

२६ नोव्हेंबर हा दिवस फक्त एका पुस्तकाचा स्वीकार दिवस नाही; हा दिवस देशाच्या आत्म्याची, विचारांची आणि मूल्यांची पुनर्स्थापना करणारा दिवस आहे. भारतीय संविधान म्हणजे केवळ कायद्याचा ग्रंथ नव्हे, तर लाखो वंचितांच्या आशेचा दीपस्तंभ आहे आणि त्या दिपस्तंभाचे निर्माता होते एक व्यक्ति नव्हे तर विचारांचा महासागर भारताचे आधुनिक बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर. भारतीय संविधानाची सर्वात मोठी देणगी म्हणजे समता. हजारो वर्षे भारतीय समाज वर्ण, जात, भेदभाव आणि उपेक्षेच्या खोल अंधारात अडकून पडला होता. त्या अंधारातून बाहेर पडण्याचा निर्धार करणारे आणि संपूर्ण देशाला कायद्यासमोर सर्व समान. या अमर संदेशाने प्रकाशमान करणारे होते बाबासाहेब. ही ओळ वाचायला सोपी असली तरी तिच्यामागे लपलेली क्रांती भव्य होती. पहिल्यांदाच एका सामान्य माणसाला जाणवलं, मीही कोणापेक्षा कमी नाही.

-------------

बाबासाहेबांसाठी समता ही केवळ राजकीय संकल्पना नव्हती तर ती त्यांच्या जगण्याचा श्वास होती. अन्याय त्यांनी पाहिला नाही, तर अनुभवला होता. अपमान ऐकला नाही, तर भोगला होता, पण संघर्ष त्यांनी सहन केला नाही तर स्वीकारला, कारण उद्दिष्ट एकच होतं शोषित, उपेक्षित, दुर्लक्षित आणि वंचित यांना मानाचा अधिकार देणे.

संविधान तयार करताना त्यांनी फक्त कलमे लिहिली नाहीत; त्यांनी त्या प्रत्येक कलमात मानवतेची ज्योत रोवली. ते म्हणत, राजकीय लोकशाही तेव्हाच टिकते, जेव्हा सामाजिक आणि आर्थिक लोकशाही तिचा पाया असतात.ह्व या तीन स्तंभांवर उभारलेला नवा भारत म्हणजे समतेचा खरा राष्ट्रदिवस. भारतीय संविधानाचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्याची मानवी संवेदनशीलता. संविधान म्हणत नाही.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

तुमची जात काय? संविधान विचारत नाही, तुमचा धर्म कोणता? संविधान शोधत नाही. तुमची स्थिती, पैसा, ओळख किंवा परंपरा कोणती? ते फक्त एकच प्रश्न विचारते, तुम्ही ह्यमानवह्ल आहात का? जर उत्तर होय असेल, तर संविधान तुम्हाला समान दर्जा, समान स्वातंत्र्य आणि समान संधी देते.

बाबासाहेबांनी संविधानाला तीन प्रमुख दिशा दिल्या. राजकीय समता, मतदानाचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, न्यायाचा समान हक्क, ही मूल्ये प्रत्येक नागरिकाला सत्ताशी जोडतात. सामाजिक समता, जातिभेद, अस्पृश्यता, भेदभाव. या सर्वांविरुद्ध संविधानाने कठोर भूमिका घेतली, ही क्रांती होती. आर्थिक समता, शिक्षण, रोजगार, आरक्षण, संधींची दारे वंचितांना उभं राहण्यासाठी जे आवश्यक ते संविधानाने पुरवलं. ही बाबासाहेबांची समतेची त्रिसूत्री आजही भारताच्या शक्तीचा मूलाधार आहे.

संविधान दिन फक्त उत्सवच नाही तर आत्मपरीक्षणाचीही हाक आहे. आज आपण संविधान दिन साजरा करतो, पण त्याचवेळी आपल्याला काही प्रश्न स्वतःला विचारावे लागतात. आपण खरोखर समतेकडे वाटचाल करतोय का?; अजूनही भेदभाव, असमानता आणि अन्याय दिसत नाहीत का?; संविधान दिलेल्या आदर्शांची आपण पायमल्ली करत नाही ना? संविधानाचा दिवस म्हणजे फक्त अभिवादन नाही, तो जागृतीचा दिवस आहे. तो सांगतो, आपण स्वातंत्र्य मिळवलं आहे पण समानता अजूनही अपूर्ण आहे.

बाबासाहेब सांगून गेले, शिक्षण ही समाज परिवर्तनाची गुरुकिल्ली आहे. यावरच भारताचा भविष्यकाळ टिकलाय. समाजात समान स्पर्धा निर्माण करायची असेल, न्याय्य व्यवस्था उभी करायची असेल तर शिक्षण सर्वांना समान हवं आणि लोकशाही तेव्हाच मजबूत होईल जेव्हा नागरिक जागरूक, स्वतंत्र, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले आणि भेदभावाविरुद्ध उभे राहणारे असतील. संविधान आपली श्रद्धा, बाबासाहेब आपले मार्गदर्शक आहेत.

संविधान दिन हा फक्त दिनविशेष नाही; तो कृतज्ञतेचा दिवस, स्मृतींचा दिवस आणि प्रेरणेचा दिवस आहे. भारतातील प्रत्येक नागरिकाने आज एक गोष्ट आठवावी, आपण स्वातंत्र्याचे, न्यायाचे, समतेचे आणि बंधुतेचे जे स्वप्न पाहतो, ते बाबासाहेबांनी आपल्या हातांनी बांधलेल्या संविधानामुळेच शक्य झाले. भारतीय संविधान हा केवळ देशाचा कायदा नाही, तर तो भारताच्या प्रत्येक नागरिकाच्या समान स्वप्नांचा, समान सन्मानाचा आणि समान अधिकारांचा पवित्र करार आहे आणि त्या कराराचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय लोकशाहीचे सर्वोच्च दीपस्तंभ आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने १८ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण असल्याने राज्यातील शाळा/महाविद्यालये, शैक्षणिक संकुले, शासकीय वसतिगृहे, शासकीय निवासी शाळा त्याचबरोबर शासन मान्यताप्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित शाळा/आश्रमशाळा व वसतिगृहे, ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था तसेच महाराष्ट्र विधानपरिषद, विधानसभा अशा सर्व ठिकाणी भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता, घटनात्मक अधिकार व कर्तव्यांबद्दल सर्व नागरिकांमध्ये जागरुकता वाढविण्यासाठी संविधान अमृत महोत्सव २०२४-२५ घर घर संविधान हा कार्यक्रम राज्यभर वर्षभर उत्साहात राबविण्याकरिता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्यात.

तसेच या कार्यक्रमाची सांगता करत असताना सदर कार्यक्रमातर्गत भारतीय संविधानाविर्षयी जनजागृती करण्यासाठी तसेच उपेक्षित समुदायांमध्ये घटनात्मक अधिकार व कर्तव्यांबद्दल जागरुकता वाढविण्यासाठी संविधान अमृत महोत्सव या कार्यक्रमांतर्गत २६ नोव्हेंबर २०२५ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत राज्यातील सर्व ठिकाणी विविध उपक्रम व कार्यक्रमांचे विशेष आयोजन सर्व स्तरावर करण्यात यावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

शाळा/महाविद्यालयांच्या दर्शनी भागात संविधानाची उद्देशिका लावणे, शालेय परिपाठात तसेच वसतिगृह प्रार्थनेत दररोज संविधान उद्देशिकेचे वाचन विद्यार्थ्यांकडून करवून घेणे, शालेय वाचनालयात संविधानाच्या किमान ५ प्रती विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करून देणे, भारतीय संविधान बाबत सर्वसाधारण माहिती देणे, जसे, संविधान सभा निर्मिती, निर्मिती समिती, अनुच्छेद, विशेषता, मुलभूत कर्तव्ये यावर व्याख्यानाचे आयोजन करणे, विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील प्रमुख प्रकरणे, मुलभूत हक्क आणि मुलभूत कर्तव्ये यावर मार्गदर्शन करणे, कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांना संविधानाचे तत्वज्ञान आणि मुल्ये समजावून सांगणे, संविधान दिन कार्यक्रम आयोजित करणे ज्यात पथनाट्य आणि पोस्टर प्रदर्शन याचा समावेश असावा, संविधानावर आधारित निबंध लेखन, भाषण, वादविवाद, चित्रकला स्पर्धा ई. उपक्रमांचे आयोजन करणे, प्रजासत्ताक दिनी संविधानातील मुल्यांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम जसे देशभक्तिपर गाणी, नाटक आणि नृत्य आयोजन व सादरीकरण करणे आणि राज्यातील 36 जिल्हयांमध्ये संविधानाचे प्रबोधन होण्याकरिता संविधान संमेलनाचे आयोजन करण्याचे निर्देशित केले आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे**
**संविधान सभेतील शेवटचे चेतावणीपर भाषण.**

संविधान कितीही चांगले असले तरी ते चालविणारे लोक जर चांगले नसतील, तर ते निष्फळ ठरेल पण एखाद्या देशाचे संविधान कितीही वाईट असेल आणि चालविणारे जर चांगले असेल तर ते संविधान देशाचा उध्दार करेल. आज दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मंडेला यांनी भारताचं संविधान जशास तसं स्वीकारलं, कारण ते मानवाधिकारांचं जागतिक प्रतीक बनलं आहे. भारताच्या संविधानाधानावर जागतिक मानव अधिकार संघटन काम करते आणि भारतीय राज्यघटनेचा भाग हाच जगातील काम करणाऱ्या जागतिक मानव अधिकार आहे.

आज संविधान बदलण्याची भाषा केली जाते, पण हा डाव लोकशाहीच्या आत्म्यावरचा आघात आहे आणि हा डाव हाणून पाडणे हे संविधान प्रेमींची जबाबदारी आहे! संविधान हे केवळ कायद्याचं पुस्तक नाही, तर ते भारताच्या आत्म्याचं आरशातलं प्रतिबिंब आहे. संविधान दिनी बाबासाहेबांचा संघर्ष स्मरुन गावात, देशात संविधान सुरक्षित राहील या दृष्टीने प्रयत्न करावे या महापुरुषांच्या शांतता, शैक्षणिक, सामाजिक विचारांचा प्रचार प्रसार करावा. संविधान दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा! ■ ■ ■

# भारतीय संविधानात उदात्त जीवनमुल्ये

भारतीय संविधानकर्त्यांना देशातील पारंपारिक विषमता मुलक मानसिकतेचे चांगलेच ज्ञान व भान होते. म्हणुनच त्यांनी संविधानामध्ये मूलभूत हक्काची तरतूद केली आहे. त्यानुसार प्रत्येक भारतीयास जिवीत राहणे आणि व्यक्तीगत स्वातंत्र्य यांच्या संरक्षणाची हमी देते, ते कलम २१ होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान समाज सुधारक, जागतिक थोर व्यक्तिपैकी एक जगातील कायदे पंडीतांनी स्वाभिमान बाळगावा इतके विद्वान घटनाकार होते. त्यांच्यात विद्वत्ता, शालीनता, उदारता आणि साधेपणाने भाराऊन टाकणारे प्रभावी व्यक्तिमत्वातील भारदस्तपणा व निर्भीड टिकाकार म्हणून या देशाला त्यांची दखल घ्यावी लागली म्हणुनच की काय देशाचे संविधान लिहिण्याची जवाबदारी त्यांना सोपविण्यात आली.

देश कोणत्या कलमानुसार चालेल या संबंधीची राज्यघटना २ वर्ष ११ महिने १७ दिवस म्हणजेच जवळपास ३ वर्षाच्या परिश्रमानंतर भारतीय राज्यघटना परिषदेने तयार केल्यानुसार भारतीय राज्यघटनेच्या मसूदा समितीचे अध्यक्ष डॉ. भी. रा. आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनेच्या संपूर्ण चर्चेनंतर घटना परिषदेचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद व पंडीत जवाहरलाल नेहरु यांना सादर केली आणि आज ही भारतीय राज्यघटना २६ जानेवारी १९५० पासून स्वातंत्र्य सार्वभौम लोकशाही प्रधान भारतात मोठ्या दिमाखाने वाटचाल करीत आहे, अशी घटना जगातील कोणत्याही देशाची नाही ही भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे.



प्रभाकर सोमकुवर
नागपूर
9595255952

राष्ट्र कोणते ही असो, राष्ट्र सुरक्षित चालविण्यासाठी तेथील घटना परिषद आपापल्या राष्ट्राची घटना बनवीत असते. फ्रांस, जर्मनी, रशिया, कॅनडा, द. अफ्रिका व अमेरिका वगैरे राष्ट्रांनी आपापल्या घटना याच पध्दतीने तयार केल्या. परतंत्र राष्ट्रक्रांती करुनच घटना परिषद बोलावतात व घटना तयार करतात, असा एक समज आहे.

तो बरोबर नाही आणि घटना परिषदेला क्रांती आवश्यक असते असेही नाही. भिन्न-भिन्न परिस्थितीत भिन्न-भिन्न राष्ट्रांनी आपापल्या घटना बनविल्या व त्या कार्यक्षम केल्या. राज्य चालविण्याकरिता जी तत्वे अगर नियम देशातील ज्ञानी तयार करतात, तिला घटना म्हणतात.

ही घटना मुक्त वातावरणात अनिर्बंध स्थितीत तयार केली, तर ती जास्त परिणाम सक्षम होत असते. डॉ बाबासाहेब आंबेडकर मसूदा समितीचे अध्यक्ष असुनही घटनात्मक विधी नियमाचे रुप देऊ शकले नाहीत. उलट डॉ आंबेडकरांच्या विद्वत्तेचा तत्कालीन राज्यकर्त्या वगार्ने त्यांच्या वर्गीय हिताच्या समर्थनार्थ बाबासाहेबांचा उपयोग करुन घेतला तेव्हा हा देश तगू शकला.

घटना ही राज्याचे स्वातंत्र्य अबाधित ठेवून त्या राज्याच्या घटकांना व देशातील व्यक्तींना स्वातंत्र्य देत असते. व्यक्तीच्या किंवा घटकांच्या स्वातंत्र्यामुळे तर राज्यच धोक्यात येत असेल तर त्या स्वातंत्र्याला मुरड घालणे अपरिहार्य होते. राष्ट्राचे स्थैर्य नुसत्या लष्करी सत्तेवर अवलंबून नसते. आर्थिक स्थैर्य नसलेली घटना ही केव्हा कोलमडून पडेल हे सांगता येत नाही. तेव्हा ज्या घटनेत आर्थिक स्थैर्याची तरतूद नसते ती घटना कितीही प्रगतीपर वाटली तरी शेवटी ती क्षीण होत जाते.

सामाजिक समता ही देखील असावी लागते. समाज जर भेदा-भेदांनी पोखरला गेला तर त्यात आपलेपणाची भावना उरत नाही आणि राज्य दुर्बल होत जाते. तेव्हा राज्याच्या स्थैर्यला बाधा येऊ न देता राजकीय, आर्थिक, सामाजिक, भाषिक, सांस्कृतिक वगैरे प्रश्नांचा विचार करावा लागतो.

कोणतीही घटना चांगली वा वाईट हे ठरविण्याचा प्रयत्न सुरुवातीला कोणी करु नये, कारण घटना ही मुलतः अचेतन असते. तिच्यातील परिणाम क्षमताही व्यक्ती तिचा वापर ज्या प्रमाणे करतील त्यावर अवलंबून असते. चांगली घटना वाईट कारभारामुळे भ्रष्ट होते आणि बाहयतः वाईट दिसणारी घटना चांगल्या व्यक्तीच्या हातात गेली तर ती चांगली ठरते.

घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बी. आर. आंबेडकर आपल्या उत्तरादाखल सविस्तर विचार मांडतांना म्हणतात की, मसुदा समितीने केलेल्या कामाची घटना परिषदेच्या सर्व सभासदांना एकमुखाने प्रशंसा केली आहे, हे पाहून मला अत्यंत आनंद वाटतो. मसुदा समितीने घेतलेल्या परिश्रमाचे इतक्या औदार्याने व मनःपूर्वक गुणग्रहण होत आहे. याबदल मसुदा समितीला धन्यता वाटेल, अशी माझी खात्री आहे.

घटना परिषदेच्या सभासद व मसुदा समितीतील माझ्या सहकाऱ्यांनी माझ्यावर जो स्तुतीचा वर्षाव केला आहे, त्यामुळे मी इतका दडपून गेलो आहे की, त्यांच्यासंबंधी योग्य शब्दात व पूर्णपणे कृतज्ञता व्यक्त करता येणे मला अशक्य वाटते. कोणतीही घटना परिणामकारक होण्याकरता तिच्यात पुरेसा लवचिकपणा असावा लागतो. राज्यावर संकटे आले म्हणजे सारी सत्ता मध्यवती सत्तेला आपल्या हातात घेता आली पाहिजे. त्याशिवाय देशाचे रक्षण होत नाही, हा आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे.

ते पुढे म्हणतात की, मी फक्त अनुसुचित जातीच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याची आकांक्षा धरुन मी घटना परिषदेत आलो, त्यावेळी जास्त जबाबदारीची कार्ये माज्यावर सोपविली जातील अशी मला किंचितही कल्पना नव्हती. म्हणून घटना परिषदेने मसुदा समितीवर मला जेव्हा निवडले तेव्हा मला मोठे आश्चर्य वाटले आणि मसुदा समितीच्या संभासदांनी समितीचा अध्यक्ष म्हणून माझी जेव्हा घोषणा केली तेव्हा माज्या आश्चर्यास पारावार राहिला नाही.

आपल्या मसुदा समितीत माझ्यापेक्षा अधिक मोठे विद्वान अधिक तोलाचे व अधिक लायक लोक होते, तरी देखील मसुदा समितीने माज्यावर जो विश्वास टाकला व माज्याकडून हे काम करवून घेऊन देशाची सेवा करण्याची मला जी संधी दिली, त्याबद्दल मी त्या सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.

भारतीय जनतेच्या हाती घटना सोपवितांना आणि १९५४ मध्ये बनारस हिंदू विद्यापीठासमोर भाषण करतांना बाबासाहेबांनी विचार मांडले होते. देशाहाती घटना देतांना बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, ज्या दिवशी जात आणि धर्माचा आधार घेवून राजकारण केले जाईल, त्यावेळी पहिल्यांदा लोकशाही धोक्यात येईल व त्यानंतर स्वातंत्र्य धोक्यात येईल. बाबासाहेबांपुढे उभ्या ठाकणाऱ्या सामाजिक संघर्षाची जाणीव होती म्हणूनच विशेष करुन जी मंडळी वैदीक परंपरा मानतात त्यांच्या साठीच बाबासाहेबांनी ही भूमिका मांडली होती.

वैदिक धर्म पाळणाऱ्यांना मनुस्मृती मधील सामाजिक व्यवस्था अभिप्रेत आहे, तिला ते मानतात ही मनुची विचार सरणी आणि भारतीय राज्य घटनेची सामाजिक विचार सरणी या एकमेकांच्या विरोधी आहेत. भारतीय राज्य घटनेचा सामाजिक रस्ता उत्तरेकडे चालला असेल तर वैदिक धर्मातील मनुने सांगितलेल्या सामाजिक व्यवस्थेचा रस्ता हा दक्षिणेकडे चाललेला आहे. या दोन विरोधी रस्त्यांपैकी वैदीक परंपरा सोडून भारतीय राज्य घटनेत मांडलेला सामाजिक समतेचा रस्ताच तुम्ही स्विकारला पाहिजे, असे बाबासाहेबांचे म्हणणे होते. पूर्वी लोक मागासवर्गीय लोकांना शिवत नव्हते, आता तीच लोकं मागासवर्गीय होण्यासाठी आंदोलन करतात! खरंच बाबासाहेब तुम्ही ग्रेट आहात !

एक लक्षात ठेवावे लागेल, अविष्कार स्वातंत्र्याच तत्व ज्या राज्य घटनेत समाविष्ट आहेत. तीचे शिल्पकार डॉ आंबेडकर आहेत. या देशाच्या इतिहासात आपल्या पूर्वजांना हजारो वर्ष अभिव्यक्ति आणि अविष्कार स्वातंत्र्य नाकारण्यात आलं होतं आणि आपल्या वंशजांनाही ते सहजासहजी मिळणार नाही याची पूर्व कल्पना डॉ बाबासाहेबांना होती. तेव्हा त्यांनी वंचितांच्या हातात एक शस्त्र दिलं, ते केव्हा उगारायचं त्याचा मान न ठेवता शस्त्रच जर पार बोथड केले तर शोषकच पुन्हा मुजोर होतील असा सावधतेचा इशारा सुध्दा त्यांनी दिला होता.

बाबासाहेबांच्या अस्मितेचा साक्षात्कार या दुर्दैवी देशाला झाला नाही, हीच खरी शोकांतीका म्हणावी लागेल. परंतू बाबासाहेब मात्र घटनाकार त्याचप्रमाणे भाष्यकार म्हणुन भारतातच नव्हे तर जगात विख्यात झालेत त्यांची दिगंत किर्ती अशीच अविचलित आणि अविस्मरणिय आहे व राहील.

डॉ बाबासाहेबांच्या संपूर्ण चळवळीत व लिखाणात एकच ध्यास होता, तो म्हणजे जातिविरहित व वर्णविरहित समाज निर्माण करण्याचा व त्यासाठीच त्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांच्या सामरिक विचारांची मुळे भारतीय राज्यघटनेत परिवर्तित होतात. त्यामुळे भारतीय राज्यघटना जगात सर्वात श्रेष्ठ म्हणून मान्यता पावली. डॉ आंबेडकर दृष्टया युगपुरुषाचे या देशावर फार मोठे उपकार आहेत, ते केवळ विशिष्ट समाजाचे नेते नव्हते तर ते या देशाचेच खरे आधारस्तंभ होते. हा देश राष्ट्र म्हणुन भक्कमपणे उभा करण्यासाठी त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्षा, लोकशाही, समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, आर्थकि न्याय, राजकिय न्याय, संधीची समानता आम्हाला ही उदात्त जीवनमुल्ये दिली, ती आपण सर्वांनी जोपासली पाहिजे.

■ ■ ■

# संविधान धोक्यात आले तर देशाचा विनाश अटळ

२ वर्षे ११ महिने १७ दिवसांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र परिश्रम घेऊन तसेच अठरा-अठरा तास अभ्यास, चिंतन व मनन करून भारतीय संविधान लिहून हजारो वर्षापासून गुलामगिरीत खितपत पडलेल्या बहुजन समाजाला त्यांचे मूलभूत हक्क व अधिकार संविधानाच्या माध्यमातून मिळवून दिले.

भारतीय संविधान अस्तित्वात येण्याच्या अगोदर देशात हुकूमशाहीचा बोलबाला होता. इंग्रजांच्या जुलमी राजवटीत आपल्याला त्यांच्या इशाऱ्यावर चालावे लागायचे. जेव्हा देशात मनुस्मृती अस्तित्वात होती, तेव्हा येथील शूद्र व अतिशूद्र प्रवगार्तील लोकांना हिन व नीच दर्जाची वागणूक दिली जात होती.

शाळा शिकत असताना बाबासाहेबांना जातीयतेचे विखारी चटके पदोपदी सहन करावे लागायचे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संध्याकाळी दिव्याखाली बसून अभ्यास करायचे आणि दिवसा शाळेत गेल्यावर वर्गाच्या बाहेर बसून अभ्यास करायचे. शाळेतील मास्तर जे शिकवतील ते नीट ध्यान देऊन ऐकायचे आणि एकेक पावाचा तुकडा खाऊन अठरा-अठरा तास अभ्यास करायचे. त्यांना येथील मनुवादी व्यवस्थेची प्रचंड चिड होती. बाबासाहेबांनी खूप शिक्षण घेऊन सर्व जाती-धर्माचा सखोल अभ्यास करून अन्याय, अत्याचाराला कारणीभूत मनस्मृतीला अगोदर रायगडाच्या पायथ्याशी जाळून छत्रपती शिवरायांच्या अपमानाचा बदला घेतला आणि भारतीय संविधान लिहून सर्व जाती धर्माला घटनेच्या माध्यमातून मूलभूत हक्क व अधिकार बहाल करून दिले. भारतीय संविधानाच्या माध्यमातून समस्त बहुजन समाजाला समता, स्वातंत्र्य, बंधुत्व बहाल करून दिले.

देश स्वतंत्र होऊन व देशात लोकशाही येऊन खूप वर्षे लोटली तरीसुद्धा देशात भारतीय संविधानानुसार देशाचा राज्यकारभार खरंच चालतो का? देशात बलात्कार करणाऱ्या नराधमांना संविधानानुसार कठोर शिक्षा मिळते का? देशात शेतकरी व शेतमजूर सुखी आहेत का? सरकार संविधानानुसार देशाचा राज्यकारभार करतो का? गोरगरीब शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या पाठीमागे सरकार खंबीरपणे उभे आहे का? भारतीय संविधान पुरुषांएवढेच महिलांना सुद्धा स्वातंत्र्य देते. पण देशात किती महिला सुरक्षित आहेत? किती महिलांना बाहेर फिरायचे स्वातंत्र्य आहे? स्वातंत्र्य असूनही जर महिलांना चूल आणि मूल इतक्या पुरतेच मर्यादित ठेवत असाल तर भारतीय संविधानाचा हा घोर अपमान आहे.



बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, जि. लातूर.
7498715661

पीडित मुलींना व महिलांना न्याय मिळत नाही. शेतकरी आत्महत्या रोज कुठे ना कुठेतरी होतच आहेत. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य हमीभाव मिळत नाही. शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचा भार शासन कमी करत नाही. महिलांना स्वातंत्र्य असून सुद्धा बनाच घरातील पुरुष महिलांना घराचा उंबरठा ओलांडू देत नाहीत. बरेच आई-वडील मुलींना उच्च शिक्षण शिकू देत नाहीत राजकीय क्षेत्रात बरेच राजकारणी घोटाळे व भ्रष्टाचार करण्यात माहीर असतात. मोठमोठे घोटाळे व भ्रष्टाचार करून देखील शासन अशा घोटाळेबाज व भ्रष्टाचारी राजकारणी लोकांना कोणतीच शिक्षा देत नाही. म्हणजे शासन एक प्रकारे संविधानाचा अपमान करत आहे.

शासन गोरगरिबांना न्याय न देता श्रीमंतांच्या बाजूने उभे राहत आहे. मोठमोठे लोक लाच देऊन आपले गुन्हे माफ करतात. परंतु गोरगरिबांना शासन न्याय देण्यात कुठेतरी कमी पडत आहे. कित्येक गोरगरीब लोक आहेत जे की, न्यायासाठी बेजार आहेत. तरीसुद्धा त्यांना शासन दरबारी न्याय मिळत नाही. हा संविधानाचा घोर अपमान होत आहे. खूप वर्षे झाली पण अजूनही डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली नाही. आतापर्यंत कित्येक मुलींवर व महिलांवर बलात्कार झाले आहेत, तरीसुद्धा बलात्कारी मोकाट फिरत आहेत, पण पिडीतांना न्याय मिळत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते संविधान कितीही चांगले असून काही फायदा नाही. ते चालवणारे सरकार किती चांगले आहे? यावरून त्याचे चांगले वाईट पण अवलंबून असते. कारण सरकार जर चांगले असेल तर त्या संविधानाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होते.

परंतु आजकालचे सरकार भारतीय संविधानाला न्याय देण्यात कुचकामी व निष्क्रिय ठरत आहेत. भारतीय संविधानानुसार न्याय न देता देशात एक प्रकारची हुकुमशाही आणत आहेत. यामुळे लोकशाही धोक्यात येत आहे. लोकशाही धोक्यात आली आणि या देशाचा कारभार जर संविधानानुसार योग्य पद्धतीने होत नसेल तर हा देश पुन्हा एकदा हुकूमशाहीच्या वाटेवर असेल. देशात हुकूमशाही आली आणि संविधान धोक्यात आले तर हा देश सुद्धा धोक्यात येऊ शकतो आणि तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असू शकतो. भारतीय संविधान धोक्यात आले तर मग मात्र देशाचा विनाश अटळ आहे. भारतीय संविधान दिनाच्या सर्व भारतीयांना खूप खूप हार्दिक शुभेच्छा.

